आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, ५ ऑक्टोबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ६३
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) THURSDAY 5 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-63 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# वन्यजीव सप्ताहात वाघीण व हत्तीचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**श्याम हेडाऊ**

**चंद्रपूर : एकीकडे सर्वत्र वन्यजिव सप्ताह साजरा होत असतांनाच वनमंत्र्यांचा जिल्हा म्हणून ओळख असलेल्या आणि पट्टेदार वाघांसाठी संपूर्ण जगात प्रसिद्ध असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यात मात्र एक वाघिण आणि एका हत्ती च्या मृत्यू ने चांगलीच खळबळ माजली आहे. भद्रावती वनपरिक्षेत्रातील चिपराळा नियतक्षेत्रामधे कक्ष क्रमांक २११ मधे कुजलेल्या अवस्थेत वाघाचा मृतदेह आढळून आला. तर ब्रम्हपुरी वनविभागांतर्गत सिंदेवाही वनपरिक्षेत्रातील लोनखैरी मौजा चिटकी कक्ष क्रमांक २४७ च्या शेतशिवारामध्ये विद्यूत तारेच्या आघाताने एका जंगली हत्तीचा मृत्यू झाला आहे. या दोन्ही घटनांनी चंद्रपूर च्या वन्यजिव सप्ताहावर दुःखाची छाया पडलेली आहे. तर वन्यजिव प्रेमिंमध्ये मात्र सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.**

वनविभागाचे कर्मचारी गस्तीवर असतांना आढळून आलेल्या भद्रावती वनपरिक्षेत्रातील मृत वाघिणीचे चंद्रपूर येथील ट्रांझिट ट्रिटमेंट सेंटर येथे विभागीय वन अधिकारी प्रशांत खाडे , सहा.वन संरक्षक आदेशकुमार शेडगे , व्हि.व्हि. शिंदे , वनरक्षक जे. ई. देवगडे , पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर रविकांत खोब्रागडे, डॉक्टर कुंदन पोहचलवार, ईको प्रो चे बंडू धोतरे यांच्या उपस्थितीत शवविच्छेदन करण्यात आले. या वाघिणीचे वय सहा ते सात वर्ष असून वाघिणीचे सर्व अवयव शाबूत असून शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे स्पष्ट होईल. तर ३/१०/२०२३ ला सकाळी ७.३० च्या सुमारास जंगली हत्ती (नर) वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष मृत पावल्याची घटना सिंदेवाही वनपरिक्षेत्रात उघडकीस आली. या घटनेचे वृत्त कळताच वनाधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पशुवैद्यकीय अधिकारी





डॉक्टर रविकांत खोब्रागडे, पशुधन विकास अधिकारी सिंदेवाही डॉक्टर सुरपाम, डॉक्टर शालिनी लोंढे या चमूने हत्तीचे शवविच्छेदन केले. शवविच्छेदनानंतर मुख्य वनसंरक्षक जितेंद्र रामगावकर, उपवनसंरक्षक ब्रम्हपुरी दिनेश मल्होत्रा, व इतर वनअधिकारी, वैद्यकीय चमू, मानद वन्यजिव रक्षक बंडू धोतरे यांच्या उपस्थितीत हस्तीदंत व हत्ती चे दफन दफन करण्यात आले. घटना स्थळ व हत्तीच्या निरिक्षणानंतर शेतशिवारात असलेल्या विद्यूत प्रवाहाच्या आघाताने हत्तीचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार अशोक पांडुरंग बोरकर रा. चिकटी, वय ६५ व अजय अशोक बोरकर, रा. चिकटी, वय २९ यांना ताब्यात घेऊन त्यांच्या विरुद्ध वन गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

वनमंत्र्यांचा जिल्हा असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यात घडलेल्या दोन्ही घटनांनी चंद्रपूर जिल्ह्यातील वनविभागात प्रचंड खळबळ माजली असून वन्यजिव सप्ताह साजरा होत असतांनाच झालेल्या या दुःखद घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# पारदर्शक रहा; सूडभावनेने काम करू नका

## सर्वोच्च न्यायालयाने ईडीला फटकारले



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : ईडीच्या कार्यपद्धतीवर आत्तापर्यंत देश पातळीवर विरोधी पक्षांनी अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. सत्ताधारी भाजपाकडून ईडीचा गैरवापर करून विरोधी पक्षांना नामोहरम करण्याचे प्रकार होत असल्याचे आरोप करण्यात आले आहेत. फक्त विरोधकांना त्रास देण्यासाठी ईडीकडून कारवाई केली जात असल्याचीही टीका विरोधकांकडून केली जात आहे. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात ईडीला फटकारल्याची मोठी चर्चा सध्या राजकीय वर्तुळात होत आहे. या आदशांची प्रत आज सकाळी जाहीर झाली असून त्यात सर्वोच्च न्यायालयाने ईडीला नेमके काय म्हटले, याची सत्यता समोर आली आहे.**

सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणाच्या सुनावणीसंदर्भात आदेश देताना ईडीला परखड शब्दांत सुनावले. “ईडीने पारदर्शक, निष्पक्षता आणि सत्यतेच्या मूलभूत मापदंडांचे पालन केले पाहिजे. ईडीची कारवाई सूड घेण्याच्या भूमिकेतील नसावी. तसेच अटकेचे कारण सिद्ध करण्यासाठी केवळ रिमांडचा आदेश देणे पुरेसे नाही. ईडी ही देशातील आर्थिक गुन्ह्यांना आळा घालणारी एक प्रमुख तपास यंत्रणा असल्याने, ईडीची प्रत्येक कृती पारदर्शक, कायदेशीर आणि न्याय्य मानकांशी सुसंगत असणे अपेक्षित आहे, अशा शब्दांत न्यायालयाने ईडीला फटकारले. एमथ्रीएम ग्रुपचे संचालक पंकज बन्सल व बसंत बन्सल यांना ईडीने काही दिवसांपूर्वी आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात


> आरोपींकडून देण्यात आलेली उत्तरे दिशाभूल करणारी असल्याचा दावा ईडीकडून न्यायालयात करण्यात आला होता . त्यावरूनही सर्वोच्च न्यायालयाने ईडीचे कान टोचले . काहीही झाले, तरी ईडीचे अधिकारी अशी अपेक्षा करू शकत नाहीत की समन्स बजावण्यात आलेले आरोपी गुन्ह्याची कबुली देतील आणि त्यापेक्षा इतर कोणतंही उत्तर दिशाभूल करणारे असेल, असे न्यायालयाने यावेळी नमूद केले .

अटक केली होती. अटकेवेळी अटकेचे कारणही ईडीच्या अधिकाऱ्यांनी त्यांना तोंडी वाचून दाखवले होते. यासंदर्भात न्यायालयाने ईडीला फटकारताना अटकेवेळी आरोपींना अटकेच्या कारणांची एक लेखी प्रत देणे आवश्यक असल्याचे नमूद केले. तसेच, संचालकांची अटक बेकायदा ठरवून न्यायालयाने त्यांची तात्काळ सुटका करण्याचे आदेश दिले. आरोपीने समन्सला योग्य प्रतिसाद दिला नाही म्हणजे तो कारवाईस पात्र होतो असे मानणे चुकीचे आहे, असे न्यायालयाच्या सविस्तर आदेशात नमूद करण्यात आले आहे. “ईडीकडून समन्समधून आरोपींवर करण्यात आलेल्या आरोपांना प्रतिसाद देण्यात आरोपींना अपयश आले, म्हणजे कलम १९ अंतर्गत त्यांना अटक करण्याचा अधिकार ईडीला मिळत नाही. कारण कलम १९ नुसार एखाद्या व्यक्तीला तेव्हाच अटक केली जाऊ शकते, जेव्हा अधिकाऱ्यांसमोर अशा काही गोष्टी असतील ज्यावरून त्यांना वाटेल की संबधित व्यक्ती पीएमएलएनुसार दोषी आहे, असे न्यायालयाने यावेळी स्पष्ट केले.

# पंतप्रधानांकडून २७ हजार कोटींच्या प्रकल्पांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**बस्तर :** या वर्षाच्या अखेरीस अनेक राज्यांमध्ये निवडणुका होणार



आहेत. छत्तीसगडमध्ये देखील या वर्षाच्या अखेरीस निवडणूक होणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकांमुळे राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. निवडणूक जिंकण्यासाठी येथे भाजपा आणि काँग्रेस या प्रमुख पक्षांनी आपली पूर्ण ताकद लावली आहे. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी मंगळवारी छत्तीसगड दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी छत्तीसगडमध्ये तब्बल २७ हजार कोटी रुपयांच्या अनेक विकास कामांचे उद्घाटन केले. या विकासकामांच्या उद्घाटनांमध्ये बस्तर जिल्ह्यातील नागरनार येथील NMDC स्टील लिमिटेडच्या स्टील प्लांटचा देखील समावेश आहे. पंतप्रधान नरेंद मोदींनी आपल्या दोऱ्याआधी बस्तर जिल्ह्यातील दंतेश्वर मंदिरात जाऊन दर्शन घेतले. पंतप्रधान मोदींनी बस्तर जिल्ह्यामधील नागरनार येथे २३,८०० कोटींपेक्षा जास्त रक्कम खर्चून बांधण्यात आलेल्या स्टील प्लांटचे उद्घाटन केले. NMDC स्टील प्लांट हा एक ग्रीनफिल्ड प्रोजेक्ट आहे. जिथे उच्च दर्जाचे पोलाद तयार केले जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जगदलपूर येथे सभेत बोलत होते. यावेळी मोदी म्हणाले, "देशातील प्रत्येक भागाचा विकास होईल, तेव्हाच विकसित भारताचे स्वप्न पूर्ण होईल. आज या ठिकाणी २७ हजार कोटींपेक्षा अधिक किंमतीचे विकास प्रकल्प देशाला समर्पित करण्यात आले आहेत व अनेक प्रकल्पांची पायाभरणी करण्यात आली आहे. NMDC स्टील लिमिटेडेच्या नागरनार येथील स्टील प्लांटमध्ये हजारो लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.

# पेपरफुटी व कॉपीविरोधी कठोर शिक्षेची तरतूद करा


## नाना पटोले :राज्यातील स्पर्धा परीक्षा उमेदवारांच्या अडचणी राज्यपालांनी सोडवाव्यात

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : राज्यात स्पर्धा परिक्षांची तयारी करणारे ३२ लाख विद्यार्थी आहेत. राज्य सरकारच्या विविध विभागातील नोकर भरतीसह एमपीएससीकडून केल्या जाणाऱ्या भरती प्रक्रिया वादग्रस्त व विद्यार्थ्यांवर अन्याय करणाऱ्या ठरत आहेत. राज्य शासनाला याप्रश्नी वारंवार सांगूनही त्यामध्ये काही सुधारणा होत नसल्याने राज्यपाल महोदयांनी यात हस्तक्षेप करुन या विद्यार्थ्यांच्या अडचणी व समस्या सोडवाव्यात, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विद्यार्थी प्रतिनिधींसह राजभवनवर राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेऊन विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसंदर्भात येणाऱ्या विविध अडचणी तसेच कंत्राटी नोकर भरती विरोधात निवेदन दिले. यावेळी प्रदेश कार्याध्यक्ष, माजी मंत्री नसीम खान, आमदार



धीरज लिंगाडे, प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे, प्रदेश सरचिटणीस देवानंद पवार, पनवेल जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुदान पाटील, विद्यार्थी प्रतिनिधी बळीराम डोळे, आदित्य गरकल, अनिल गिते, त्र्यंबक हिप्परकर, गणेश गोंडाळ, वैभव गाडवे आदी उपस्थित होते. राज्यपालांना दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, मुंबई पोलीस भरती, वनविभाग, तलाठी भरती तसेच एमपीएससी परीक्षेत पेपरफुटी व कॉपी संदर्भात अनेक गैरप्रकार उघडकीस आले आहेत. महाराष्ट्रात अस्तित्वात असलेल्या पेपरफुटी विरोधी कायद्यात कठोर शिक्षेची तरतूद नाही, त्यामुळे अक्षरशः टोळ्या बनवून प्रश्नपत्रिका फोडल्या जात आहेत, यामुळे गोरगरीब उमेदवार रात्रंदिवस अभ्यास करून सुद्धा मागे पडत आहेत. हे प्रकार थांबवण्यासाठी राजस्थान व उत्तराखंड राज्याप्रमाणे कठोर कायदा महाराष्ट्रात लवकरात लवकर व्हावा. राज्य सरकारच्या आशीर्वादाने खाजगी कंपन्यांकडून प्रत्येक भरती प्रक्रियेत एक हजार रुपये फी च्या नावाखाली गोरगरीब विद्यार्थ्यांची लूट केली जात आहे. या सर्व परीक्षा एमपीएससीकडे देऊन लाखो उमेदवारांना न्याय व दिलासा द्यावा. महाराष्ट्र राज्यसेवा आयोगाद्वारे निवड झालेले अनेक उमेदवार वेगवेगळे शासन धोरण व आरक्षण किंवा इतर काही कारणामुळे न्यायालयीन प्रक्रियेत अडकले आहेत अशा उमेदवारांना न्यायालयीन निकालाच्या आधिनराहून नियुक्ती देण्यात यावी. शासकीय पदभरतीचे कंत्राटीकरण त्वरित रद्द करावे व या संबधीचा 6 सप्टेंबर 2023 चा शासन निर्णय मागे घ्यावा. सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता गट- ब अराजपत्रित (अभियांत्रिकी) पदाचे नवीन सेवाप्रवेश नियम तातडीने जाहीर करावे. कमी पटसंख्येच्या शाळा बंद करून "दत्तक शाळा योजना" व "समूह शाळा हे शिक्षण हक्काची पायमल्ली करणारे जाचक निर्णय आहेत. ग्रामीण, दुर्गम भागात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी झगडत गोरगरीब विद्यार्थी शिक्षण घेत असतात. या शाळाच बंद केल्यामुळे या मुलांचे विशेषतः मुलींचे शिक्षण थांबण्याचा धोका आहे. ज्या महाराष्ट्रात शिक्षणासाठी महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या समाज सुधारकांनी आयुष्य खर्च केले त्या राज्यात असे निर्णय घेणे हे धक्कादायक व लज्जास्पद आहे, असे निवेदनात म्हटले आहे.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# होय, मला शिक्षक व्हायचं

आधुनिक केसरी

मी शाळेत शिकत असतानाची गोष्ट. आमच्या वर्गावर मराठीचा तास घेणारे अमृतकार सर इतके तन्मयतेने शिकवायचे की आम्ही त्यात रंगून जायचो. तास कधी संपला हे कळायचे नाही. त्यातूनच आमची मराठीच्या अवांतर वाचनाची आवडही त्यांनी फुलवली. कधी कधी भा. ल. कोतकर सरही आम्हाला मराठी शिकवायचे. अमृतकर सर आम्हाला इंग्रजीही शिकवायचे. गणिताचे के पी वाणी शिक्षक कठीण समीकरणे, प्रमेये अशा काही खुबीने शिकवायचे की घरी ते सोडवताना मजा यायची. विक्रम पाटील, करंदीकर सर विज्ञानाचे शिक्षक कधी प्रयोगातून तर फळ्यावर काढलेल्या आकृतीतून एखादा विषय छान समजावून द्यायचे आणि ते कायमस्वरूपी लक्षात राहायचे. रावशास्त्री म्हणजे संस्कृतचे विद्वान. असे सगळेच शिक्षक उत्तम शिकवत. आमच्या शाळेचे मुख्याध्यापक पी बी देशपांडे सर तर लीलया कुठलाही विषय शिकवू शकायचे. पण एखाद्या कार्यक्रमाच्या दिवशी सगळ्या विद्यार्थ्यांना उद्देशून ते जे भाषण करीत असत, ते मला आजही आठवते. ते म्हणायचे, ' माझ्या शाळेत तुम्ही फक्त मराठी, इंग्रजी, गणित, विज्ञान शिकण्यासाठी येत नाहीत. ते तर तुम्हाला शिकायचं आहेच पण त्याचबरोबर एक उत्तम नागरिक तुम्हाला व्हायचं आहे. तुम्ही ए बी हायस्कुलचे विद्यार्थी होता, म्हणून बाहेर तुम्हाला ओळखले गेले पाहिजे. या ठिकाणी काही शिक्षकांची नावे मी उदाहरणादाखल घेतली पण सगळेच शिक्षक असे जीव ओतून शिकवणारे होते. हे सगळे शिक्षक म्हणजे आजच्या भाषेत सांगायचं तर आमचे रोल मॉडेल्स होते. मला असं नेहमी वाटायचं की मी सुद्धा यांच्यासारखंच शिक्षक व्हावं. पण त्यांचा तो वसा घेणं सोपं नव्हतं हे मला जेव्हा मी शिक्षक झालो, तेव्हा अनुभवानं लक्षात आलं. पण शिक्षक होणं हीच मुळात किती भाग्याची आणि छान गोष्ट आहे ! तुम्ही जेव्हा शिक्षक होता, तेव्हा तुमच्यासमोर असतात रसरशीत कोवळे चेहरे, त्या चेहऱ्यांवर उत्सुकता असते, काहीतरी नवीन शिकण्याची उर्मी अंतरात असते आणि नवीन काही शिकल्यानंतर दिसणारे समाधान चेहऱ्यावर स्वच्छ झळकत असते. देशाची भावी पिढी घडवण्याचे भाग्य शिक्षकाच्याच भाळी असते. पण काळ बदलला. शिक्षक होणं सोपं राहिलं नाही. शाळा, कॉलेजात शिक्षक म्हणून लागण्यासाठी संस्थांच्या वतीने अक्षरशः लाखो रुपयांची मागणी करण्यात येऊ लागली. एवढे पैसे सामान्य माणूस कुठून आणणार ? समजा, अगदी कर्ज काढून किंवा जमीन वगैरे विकून पैशांची व्यवस्था केलीच तरी तो कायम होईल का





## आनंदी पहाट

# धनाचा मनाने मानासाठी केलेला विचार

आधुनिक केसरी

आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र आणि निवारा ह्या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमूल्यांचा देखील स्विकार करावा लागतो. आज आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारं, मानसिक आधार देणारं, अंतर्मनाला धीर देणारं, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारं, सामजिक पत निर्माण करणारं, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारं, कौटुंबिक एकोपा टिकवणारं, आपली नातीगोती जपणारं, उणीवा दूर करणारं, आपल्या जाणीवा जपणारं, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारं, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारं आपलं हक्काचं साधन हे दुसरं-तिसरं कोणतंही नसून ते म्हणजे आपण पै पै जमवलेलं धन अर्थात आपला स्वतःचा पैसा असतो. आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय म्हणजे आपली धन-दौलत. ह्या धन-दौलतीचा थेट संबंध आपल्या भाव भावनांशी असतो. आपण शरीरानं आपल्या घरापासून दूर असतो तेव्हा देखील आपल्या मनात आपलं धन आणि आपलं घर हे घर करून राहीलेलं असतं. ही घरघर प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य घटक असल्याप्रमाणे अनुभवली जात असते. आपलं मन आणि धन एकाच नाण्याच्या दोन बाजू असल्यासारख्या असतात. आपल्या मनातलं धन आणि धनाढ्य मन, तसंच मनातलं घर आणि घरातलं मन ह्या दोन्हींचा मेळ आपण घालू शकलो पाहिजेत. पै पै जमवलेली जमापुंजी आपल्या स्वतःसाठी अथवा घरासाठी वापरताना आणि मुख्य म्हणजे ती मिळवताना तसंच जमवताना अनुभवलेल्या प्रत्येक क्षणाची आठवण आपल्याला झाल्याशिवाय राहात नाही. आपलं प्रत्येक स्वप्न साकार होताना आपल्याला मिळणारा आनंद निश्चितच निराळा असतो. पण हि स्वप्न साकारण्यासाठी आपल्या पैशाची यथायोग्य बचत करणंही तितकंच जरुरीचं असतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

**सापडले धन | स्वानुभवे ||**

सापडेना कोठे | हरवले धन ||
अस्थिर हे मन | सोसवेना ||१||
चोरट्यांची जत्रा | जागोजागी भरे ||
ओसाड गाभारे | भक्तीवीना ||२||
विकारांची गर्दी | सद्गुणांची वाण ||
उरले न भान | संसारी ह्या ||३||
गवसेल कैसी | मृगास कस्तुरी ||
असता अंतरी | शोधी वेड्या ||४||
सापडले धन | सद्गुरू कृपा ||
पाहतो स्वरूपा | स्वानुभवे||१||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# गुरुवार अत्यंत श्रद्धा ठेवावी

आधुनिक केसरी

कुस्त्या खेळून, झगडून, शरीरबळ वाढते; अवघड उदाहरणे सोडवून बुद्धिबळ वाढते; तसेच, आलेल्या परिस्थितीला तोंड देऊन समाधानाने राहण्याने आत्मिक बळ वाढते. आत्मिक बळ वाढणे म्हणजे देहबुद्धी कमी होणे; आणि ते करण्याकरिताच परमेश्वर संकटे धाडतो; पण तुम्ही त्यांना भिता याला काय करावे ? अशा परिस्थितीत, संकटे परत घेणे म्हणजे तुमचे अनहित करणे होय. त्याला तुमचे हित कशात आहे हे उत्तम कळते. भोग समाधानाने भोगण्यात पुरुषार्थ आहे. दुखणे आले असता औषध घ्यावे. पण औषधात गुण तरी परमात्म्यानेच ठेवला ना ? औषधाने तरी गुण हमखास येतोच असे थोडेच आहे ? एकाला येतो, एकाला नाही. ज्याचे ज्यात हित होणे असेल तसे तो परमात्मा करतो हे लक्षात ठेवावे. तुम्ही एकच करावे, परमात्म्याला शरण जाऊन, "हा भोग भोगण्याची मला ताकद दे, समाधान भंगू देऊ नकोस, तुझे सतत स्मरण व्हावे." असे मागावे. दुखणे भोगायचे आहे



तर ते समाधानाने का नाही भोगू ? प्रारब्धाचे तुमच्या डोक्यावरचे ओझे, कर्ज, तेवढ्या प्रमाणात कमी नाही का होणार ? दुखणे आले असता त्याची उपेक्षाच करावी, म्हणजे आपोआप ते कमी होईल.
मी म्हणजे अमुक एक, अशी आपल्या अस्तित्वाविषयी जशी खात्री असते, तशी देव आहे अशी खात्री पाहिजे. आपले सद्गुरू देवच आहेत अशी आपली खात्री झाली, म्हणजे आपल्या सद्गुरूंच्या ठिकाणी भाव आहे असे म्हणता येईल. माझी सेवा तुम्ही जी करता ती तुम्ही आपल्या देहबुद्धीची केली, तुम्हाला जे पसंत तसे तुम्ही केले. वास्तविक, माझी सेवा म्हणजे मला जे आवडते ते करणे, माझ्या आज्ञेत राहणे, नामस्मरण करणे, सर्वांभूती भगवद्भाव ठेवून कुणाचे मन न दुखवणे, परमात्माच सर्व करतो अशी भावना ठेवणे, माझ्या सांगण्याचा परिणाम न होण्याची दोन कारणे असतील. एक कारण असे की, तुमच्या मनामध्ये परिवर्तन घडवून आणण्याची शक्तीच माझ्यामध्ये नसेल; किंवा दुसरे कारण असे की, तुम्ही अभ्यास करीत नसाल. पण परमार्थात एकदम फरक होणे बरे नव्हे. समजा, एखाद्याला आज १०५ ताप आहे आणि उद्या तो एकदम ९५ झाला, तर ते बरे नाही. तसेच, मनुष्य आज रागीट आणि उद्या एकदम शांत झाला तरे तेही बरे नव्हे. आपल्यामधे हळूहळू परिवर्तन व्हावे, आणि ते विवेकाने घडवून आणावे.

## निरूपण

आधुनिक केसरी

शङ्खिनीं चक्रिणीमम्बां कनकलतिकां शिवाम्|
अभीष्टफललाभाय दुर्गां देवीं नमाम्यहम्||
१०३|| सुवर्णाच्या वेलीप्रमाणे असणाऱ्या, शंख, चक्र धारण करणाऱ्या शिवाम्बिकेला, दुर्गा देवीला अभीष्ट फल प्राप्त व्हावे, यासाठी मी नमस्कार करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर


# घराघरात स्ववेंद, मनामनांत स्ववेंद, जनमनांत स्ववेंद !

जब जैसा तैसा मिलै, दुर्लभ दर्शन जाहि ।
जेहि जन निज कर जानिया, वोध भेद दरशाहि ।।५८।।(स्ववेंद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०/५८

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
ते सद्गुरू अधिकारी, भक्त-प्रेमी जनांची जेव्हा जशी स्थिती असेल त्याप्रमाणे त्यांच्या भक्ती, प्रेमानुसार त्यांना आपले दुर्लभ दर्शन देतात. ज्यांना आपला पवित्र हंस जाणतात, त्यांना ब्रह्मविद्येचे गोपनीय ज्ञान आणि भेद प्रत्यक्ष दाखवून, अनुभव, साक्षात्कार करवून देतात. हीच सद्गुरूंची महान महिमा आहे , म्हणून सद्गुरूंच्या दर्शनाला दुर्लभ म्हटलं गेलंय.

.....................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.



स्ववेंद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

## काव्य-चरितावली

आधुनिक केसरी

पुष्प ४५वे

बाळपणापासून महाराजांच्या मनी
श्रीरामप्रभू भक्ती ज्योती तेवत होती
रामनामाची भाव वृत्ती फुलली होती
तन-मन वृत्ती लीन झाली राम चरणी ।।
घडते जे जे सगळे, राम इच्छा खरे
केले मी" असे महाराज कधी न बोले
श्रीरामराय प्रति अनन्य भावे बोले
ते म्हणती-राम काय करील ते खरे ।।
भक्तजनांच्या सोयीसाठी महाराजांनी
स्वतःच्या घराच्या समोर भागामध्ये
छान राम मंदिर बांधणे सुरू केले
भक्त निधीतून हे काम होऊ लागले ।।
१८८१ साली मंदिर बांधून झाले
मूर्ती कशा, इथे कोण घेऊनी येणार ?
विचारणा महाराजांना करू लागले
करील राम सोय सारी, सांगू लागले ।।
तडवळ गावीचे कुलकर्णी भक्त एक
गोंदवल्यास महाराजांना भेटण्या आले
मूर्ती- "राम, लक्ष्मण-सीता ,घेउनी आले
श्रीमहाराजांनी पाहुण्यांचे स्वागत केले
म्हणे-कवी अरुणदास, रामरायाचे
गोंदवल्यास ऐसे आगमन हो झाले ।।



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## गहिनीनाथ

चोरांची धास्ती तर नाहींना ? हे ऐकून गुरूला चोराचे भय कशासाठी असावे, ही कल्पना गोरक्षनाथाच्या मनात उत्पन्न झाली. गुरूजवळ काही तरी वित्त असले पाहिजे व ते चोर लुटून नेतील ही भीति त्यांना आहे, असा त्याने तर्क केला व ते भय निरसन होण्याचा उपाय योजावा, असा मनात विचार करून तो काही उत्तर न देतां तसाच मुकाटयाने चालत होता. इतक्यात त्यांस एक पाण्याचे ठिकाण लागले तेथे मच्छिंद्रनाथाने गोरक्षास अंमळ थांबावयास सांगितले व आपली



# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, ५ ऑक्टोबर २०२३





उदासिनतेचे मळभ दूर करणारे साहित्यसंमेलन पान ६





सेवा हमी कायदा धाब्यावरच!! पान ७


# गिरिजा पात्रातून वाळूची अवैध वाहतूक सुरु; तर जुन्या पोलीस ठाण्याजवळ वाळू धुण्यासाठी केली विहिरीवर व्यवस्था

आधुनिक केसरी न्यूज





**रमेश दणके :** वडोद बाजार परिसरात वाळू तस्करांचे रॅकेट वाढले असून गिरजा नदीच्या पात्रातून रात्री आठ ते सकाळी सहा वाजेपर्यंत वाळूची सर्रास चोरटे वाहतूक केली जाते तर वाळू धुण्यासाठी विहिरीवर विद्युत पंप बसवण्यात आले आहे. विजेची चोरी करून विद्युत पंप चालवले जातात या विद्युत पंपाच्या माध्यमातून विहिरीच्या पाण्याने वाळू धुतली जाते व धुतलेली वाळू घेऊन जात असताना रस्त्यावर सर्वत्र चिखल पसरत आहे. यामुळे परिसरातील रस्त्यावर मोठा अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे महसूल विभागाने अवैध्य वाळू वाहतूक करणाऱ्यावर काय कारवाई करावी व वाळूचे धुण्यासाठी ज्या विहिरीचा वापर केला जातो त्यावेळी सिल करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. गिरजा नदीच्या पात्रातून अवैध्य वाळू वाहतूक सुरू असून ही वाळू गिरजा नदीकाठच्या विहिरीवर वाळू धुतले जाते व रात्रभर वाळूची सर्रास वाहतूक केली जात आहे यामुळे शासनाच्या लाखो रुपयाचा महसूल बोलत असून महसूल विभागाचे याकडे दुर्लक्ष असल्यामुळे वाळूची व अवैध वाहतूक करणाऱ्याचे व्यवसाय चांगलेच फोफा वले आहेत यात मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण-घेवाण होत असल्याने शासकीय बाबू या अवैध्य वाळूच्या वाहतुकीकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे वडोद बाजार परिसरात गिरजा नदीची मोठे पात्र असून या ठिकाणी ओळख बाजार येथून वाळूची मोठ्या प्रमाणात वाहतूक केली जाते तर जुने पोलीस ठाणे या ठिकाणी वाळू धुण्यासाठी एका विहिरीवर व्यवस्था करण्यात आलेली आहे दररोज रात्री वाळूचे ट्रॅक्टर भरून या ठिकाणी वाळू घेतली जाते पाणी नसल्याने नदीचे पात्र कोरडे आहे. परिसरात पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण झाला असून काही शेतकऱ्यांना पाणी नाही तर या ठिकाणी विहिरीच्या पाण्याने वाळू धुतली जाते. महसूल विभागाने या विहिरीवर कारवाई करून या विहिरीचे यारी विहिरीवर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे यावेळी वाहतुकीविषयी बुधवारी येथील तलाठी यांच्याशी संपर्क साधला असता त्यांना वाळूची माहिती दिली असतानाही तलाठी  गावंडे यांच्याशी संपर्क  साधून  महिती देण्यात आली तरीही  या ठिकाणी तलाठी  गावंडे पाहणी करण्यासाठी आलेच नाही त्यामुळे  तलाठी  का आले नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे तलाठी या वाळू वाहतूक व धुण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विहिरीची  पाहणी करून. कारवाई करणे अपेक्षित. अस्तांना याकडे दुर्लक्ष केले जात आहे.  महसूल विभागाच्या उदासीन धोरणामुळे गिरजा नदीच्या पात्रातून दररोज वाळूची मोठ्या प्रमाणात वाहतूक केली जाते आहे. यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल उडत असून हवे ते वाळूच्या वाहतुकीवर कारवाई करण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज आहे. तर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी अवैध्य वाळू वाहतूक कडे लक्ष देऊन ही अवैध वाळू वाहतूक थांबवावी अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## सत्ताधाऱ्यांकडून गांधींच्या मारेकऱ्यांना 'थोर नायक' ठरविण्याचा प्रयत्न : डॉ. वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** देशाच्या स्वातंत्र्यासाठी जीवन समर्पित करणारे महात्मा गांधी यांची त्याग व बलिदानाची गाथा साता समुद्रपार पोहोचली असून अनेक देशातील महत्त्वकांक्षी लोक गांधी विचार रुजविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. मात्र, देशातील सत्याधाऱ्यांकडून महात्मा गांधींना बदनाम करून त्यांच्या मारेकऱ्यांना 'थोर नायक' ठरवित धर्मांधता व जातीय भेदाचे राजकारण करून अराजकता माजविण्याचे काम सुरू आहे. अशा मनुवादी व जातीयवादी अराजकतेला ठेचून काढायचे असेल तर गांधी विचारधारा मुळापासून रुजविणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन राज्याचे विरोधी पक्षनेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी केले. ते ब्रह्मपुरी येथे महात्मा गांधी जयंती उत्सव समितीद्वारे आयोजित व्याख्यान कार्यक्रमाच्या



अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

या कार्यक्रमाला प्रमुख व्याख्यान कर्ते ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत झटाले, प्राचार्य डॉ. देविदासजी जगनाडे, ॲड. गोविंदराव भेंडारकर, धनराज मुंगले, नगराध्यक्ष रिता उराडे, उपनगराध्यक्ष अशोक रामटेके, ऋषी राऊत, विठ्ठलराव गुड्डेवार, डॉ. नामदेव कोकोडे प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते. ब्रम्हपुरी शहरातील हुतात्मा स्मारक ते बाजार चौकातील महात्मा गांधी पुतळ्यापर्यंत पदयात्रा काढण्यात आली. यावेळी महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला उपस्थित मान्यवर यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या पदयात्रेत राज्याचे विरोधी पक्षनेता विजय वडेट्टीवार हेदेखील सहभागी झाले होते. यावेळी पुढे बोलताना विरोधी पक्षनेते वडेट्टीवार म्हणाले की, महात्मा गांधींचे महत्त्व देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात तीळ मात्रही योगदान न देणाऱ्या व इंग्रजांची चाटुगिरी करणाऱ्या फितुरांना काय कळणार ? ना शस्त्र, ना दारूगोळा, ना बळाचा वापर करता आपल्या अहिंसावादी विचारातून इंग्रजांना सळो की पळो करून सोडणारे व त्यांच्या खांद्याला खांदा लावून त्यांची पत्नी कस्तुरबा यांनी महिलांसाठी दिलेले योगदान हे इतिहासात अजरामर आहे. मात्र महात्मा गांधींच्या बदनामीचे षडयंत्र सत्ताधाऱ्यांकडून रचल्या जात असले तरी गांधी विचारधारा ही कधीच नष्ट होणारी नाही.

**देशाला गांधी विचारांची गरज :** अकोला येथील प्रसिद्ध व्याख्यान कर्ते ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत झटाले यांनी ज्या गांधींवर एक लक्ष पाच हजार लेखकांकडून पुस्तकांचे लिखाण झाले व जगातील ७० देशांमध्ये गांधीजींचे पुतळे बांधले अशा महान थोर पुरुषांचा अवमान करण्यासाठी देशातील असमाजिक तत्त्वांकडून थोर महात्म्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून निशाणा साधल्या जात आहे . देश अधोगतीच्या मार्गावर आणून पूर्णता उद्ध्वस्त करण्याचा डाव मोडून काढण्यासाठी देशाला पुन्हा गांधी विचारांची गरज असल्याचे ते यावेळी म्हणाले .



## विरमगाव येथे शेतीशाळेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील  विरमगाव येथे राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस उत्पादकता वाढीव मूल्य साखळी विकास योजना अंतर्गत शेती शाळा आयोजित करण्यात आली यामध्ये गावातील शेतकरी व शिव संगमेश्वर महिला शेतकरी गट यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला.

या शेती शाळेत मंडळ कृषी अधिकारी काकासाहेब इंगळे यांनी कापूस व इतर पिकाविषयी एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन बाबत व कृषी विभागाच्या विविध योजनेचा लाभ   घ्यावा असे आवाहन शेतकऱ्यांना केले तर कृषी पर्यवेक्षक प्रभाकर घाईट यांनी सेंद्रीय शेती बाबत माहिती सांगितली. कार्यक्रमाच्या शेवटी राज्य पुरस्कृत एकात्मिक कापूस उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजना २०२३-२४ अंतर्गत शेती शाळा किट वाटप करण्यात आली. ही शेती शाळा तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर तारगे तसेच मंडळ कृषी अधिकारी काकासाहेब इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली दरम्यान या वेळी कृषी पर्यवेक्षक प्रभाकर घायट कृषी सहायक श्रीकृष्ण नागरे व कृषी मित्र सतीश अधाने, सरपंच, उपसरपंच, पोलीस पाटील यांच्यासह शेतकरी  उपस्थित होते.



## आरक्षण मिळत नाही म्हणून दिला राजीनामा

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :**  संतोष चव्हाण यांनी तालुका काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष यांच्याकडे सुपुर्त केला. जोपर्यंत मराठा समाजास आरक्षण मिळत नाही तोपर्यंत युवक काँग्रेस कन्नड सोयगाव तालुका अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला असून मराठा समाजाचे 170 आमदार असून देखील मराठा समाजाला आरक्षण मिळत नसेल तर आमच्या तालुक्यात कोनताही मंत्री आला तर आम्ही त्यांचा जाहीर निषेध करू असे राजीनामा पत्रात लिहले आहे.

## विना परवानगी भित्तीपत्रके लावणाऱ्याविरुद्ध पोलिसात तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शहरात विना परवानगी भिंतीपत्रके लावणाऱ्या संबंधिताविरुद्ध महाराष्ट्र विद्रुपीकरण कायदा १९९५ अंतर्गत चंद्रपूर महानगरपालिका झोन क्र. १ कार्यालयाद्वारे रामनगर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

शहरातील आंबेडकर कॉलेज, वरोरा नाका, जनता कॉलेज चौक, मनपा हद्दीतील शासकीय व खाजगी जागा, शहरातील पोस्ट / टेलीफोन पेटी, इलेक्ट्रिक खांब, रस्त्याच्या कडेची झाडे इत्यादींवर मुद्रा लोन योजना, आधार कार्ड लोन, ( ७२१७३१५८७९ ) हा मजकुर असलेले भिंतीपत्रके २५ सप्टेंबर मध्यरात्री शहरात जागोजागी लावले



असल्याचे सहायक आयुक्त सचिन माकोडे यांना पाहणीदरम्यान आढळुन आले. संबंधितास भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करून पत्रके काढण्यास सांगितले असता अद्याप पावेतो भिंतीपत्रके न काढल्याने संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र विद्रुपीकरण कायदा १९९५ अंतर्गत फौजदारी गुन्हा नोंद करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

चंद्रपूर महापालिकेच्या वतीने विविध स्पर्धांद्वारे शहर सुशोभीकरणाचे काम मोठ्या प्रमाणात करण्यात आले आहे. विशेषतः उड्डाणपुल, शासकीय इमारती येथे माझी वसुंधरा अंतर्गत वॉल पेंटिंगची कामे करण्यात आली आहेत. रंगरंगोटीद्वारे संपूर्ण शहर सुशोभित झाले असताना भिंतीपत्रके लावून शहर विद्रुप करण्याचा प्रयत्नांविरुद्ध मनपाने कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. भिंतीपत्रके, पोस्टर्स, बॅनरबाजीमुळे शहराच्या विद्रुपीकरणासह शहराच्या सौंदर्यात बाधा येते किंबहुना वाहतुकीसही अडथळा निर्माण होत असल्याने याबाबत उच्च न्यायालय आणि राज्य शासनाने आखुन दिलेल्या सुचनांनुसार कारवाई करण्यात येते. त्यानुसार, परवानगीशिवाय पॅम्प्लेट्स, बॅनर्स, होर्डिंग्ज,कापडी फलक लावणा-यांवर आर्थिक दंडासह कायदेशीर कारवाई करण्याची तरतूद या धोरणामध्ये करण्यात आली आहे.

## पाकमध्ये महागाईचा वणवा

आधुनिक केसरी

पाकिस्तानातील महागाईचा वणवा अद्यापही शांत झालेला नसून चार महिन्यांनंतर पुन्हा एकदा महागाई वाढली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने बेलाआऊट योजनेअंतर्गत पाकिस्तानला ३ डॉलर अब्जची मदत केल्यानंतर काही अटी घातल्या होत्या. त्यामुळे पाकिस्तानात पुन्हा एकदा महागाई वाढली आहे. पाकिस्तानातील परिस्थिती चिंताजनक बनत चालली आहे. पाकिस्तान दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर होता तेव्हा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने ३ अब्ज डॉलरची मदत करून देशाला दिवाळखोरीतून बाहेर काढलं. परंतु, त्यावेळी आयएमएफने पाकिस्तानला काही अटी शर्थीही लावल्या. त्यानुसार, पेट्रोल डिझेलच्या किमती वाढवण्याचीही अट होती. त्यामुळे सरकारने सातत्याने इंधन दरांत वाढ केली. यामुळे महागाईच्या दरांतही वाढ झाली. मे महिन्यात पाकिस्तानचा महागाई दर ३८ टक्के होता. मे महिन्यांनंतर चार महिन्यांनी सप्टेंबरचा महागाई दर ३१.४ झाला आहे. ऑगस्टमध्ये हाच दर २७.४ टक्के होता. पाकिस्तान ब्युरो ऑफ स्टॅटिस्टिक्सने ही माहिती जाहीर केली आहे. पाकिस्तानच्या काळजीवाहू सरकारने इंधनाच्या किमती वाढवल्या आहेत. तसंच, जुलैमध्ये सुरू झालेला बेलआउट कार्यक्रम सुरू ठेवण्यासाठी आयएमएफच्या अटींचा भाग म्हणून गॅसच्या किमती वाढवल्या आहेत. यामुळे पाकिस्तानात उदरनिर्वाहाचा खर्च वाढला आहे. इंधन दरांत ३१.२६ टक्क्यांनी, तर, खाद्यपदार्थांच्या किमतीत ३३.११ टक्क्यांनी वर्षभरात वाढ झाल्याचं आकडेवारीतून स्पष्ट होत आहे. तसंच, घर, पाणी आणि विजेच्या किमतीत २९.७० टक्क्यांनी वाढ झाली आहे. देशाच्या तेल आणि वायू नियामक प्राधिकरणाने (OGRA) एलपीजीची किंमत २०.८६ प्रतिकिलोने वाढवली. त्यामुळे २६०.९८ प्रति किलो एलपीजीची किंमत झाली आहे. या व्यतिरिक्त, घरगुती सिलिंडरची किंमत देखील २४६.१६ रुपयांनी वाढल्याने सिलिंडरची किंमत ३ हजार ०७९.६४ झाली आहे. तर, पाकिस्तानात पेट्रोलची किमत ३३१.३८ रुपये झाली आहे, तर डिझेल ३२९.१८ रुपयांनी विकले जात आहे.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

## लोकशाहीचा सोईनुसार अर्थ लावणाऱ्यांनो !

आधुनिक केसरी

**भारतातील लोकशाही ही जगातील एकमेव मोठी लोकशाही आहेच. परंतु भारतात खान, पान, राहणीमान, भाषा, संस्कृती आणि इतर अनेक बाबींमध्ये विविधता असून भारतीय संविधानाने सर्वांना समान करून एकसंघ ठेवले आहेत. अनेक बाबीत विविधता असताना ही येथे सुखा समाधानाने लोक राहतात याचे श्रेय केवळ आणि केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय संविधानालाच जाते. वैचारिक आणि नैतिक दिवाळखोरी करणाऱ्या लोकांना आजही डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधान हे नाव उच्चारायला लाज वाटते हि सत्यता विसरून चालणार नाही. विषमतेची घाण डोक्यात जतन करताना विद्वत्ता व देशहीताची जाणीवच बौद्धिक अपंगत्व असलेल्या लोकांना राहली नाही.**

एरवी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संविधानाचे नाव न घेणारे लोक एखादे चुकिचे उदाहरण पटवून देण्यासाठी, चुकिच्या पद्धतीने लोकशाही व संविधानाचे नाव घेऊन स्वतः ची वैचारिक अपरीपक्वता, आणि माणसिक दुर्बलता दाखवून देत असतात. लोकशाही व संविधानाचा अर्थ सोईनुसार नाही तर निती मत्ता व बुद्धीमत्ते नुसार संविधानीकच काढावा लागतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संविधान आणि लोकशाहीचा अर्थ काढण्याचा अधिकार न्यायायला आहे. ऐऱ्या गैऱ्यांनी गल्लीतील बौद्धिक दृष्ट्या कमकुवत लोकांना चुकिचा अर्थ काढण्याचा अधिकारच नाही. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकांना समान हक्क, समान संधी, समान न्याय दिलेला आहे. परंतु हजारो वर्षापासून लोकांनी विषतेच्या नावाखाली एकमेकांना हिन व तुच्छ समजून एका जातीचे दुसऱ्या जातीकडून शोषण केल्या गेले आणि विषमता कायम रहावी म्हणून खतपाणी घातल्या गेले. अशा प्रकारची विषमतेची घाण डोक्यात असलेल्या लोकांच्या मनात मानवता, न्याय वृत्ती व समतेची भावना रुजुच शकत नाही म्हणून भारताच्या संविधानाने जात धर्म लिंग वंश वर्ण यांचा भेद न करता प्रत्येकाला समान संधी दिली हिच बाब अनेक लोकांना पचत नाही. प्रत्येक नागरिकांना आपल्या धर्माचे पालन करण्याचा अधिकार, संस्कृती, भाषा जोपासण्याचा अधिकार, श्रद्धा उपासना करण्याचा अधिकार, आपल्या धर्माचा प्रसार आणि प्रचार करण्याचा अधिकार, स्वतः च्या इच्छेनुसार धर्म स्विकारण्याचा अधिकार संविधानाने बहाल केला आहे. पण याचा अर्थ असा मुळीच नाही की कोणत्याही धर्माने स्वतः चे धार्मिक विधी, उपासना, धर्माचा प्रचार प्रसार सार्वजनिक ठिकाणी, शासकीय कार्यालयात करू नये. कारण प्रत्येकाने तसे केले तर शासकीय संस्था, सार्वजनिक ठिकाणे हे धार्मिक ठिकाणे बनतील व अराजकता माजेल. प्रत्येक धर्म स्वतः चे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी आपल्याला धर्मानुसार कृत्य करेल देशहीत व मानवहीत लक्षात न घेता केवळ अराजकता व धार्मिक अंधाधुंदी माजेल. म्हणून प्रत्येकाने आपापल्या धर्माचा प्रसार प्रसार, उपासना ह्या बाबी वैद्यकीय पातळीवर करणे आवश्यक असते सार्वजनिक ठिकाणी करणे चुकिचेच आहे. लोकशाही मध्ये चुकीचे, स्वतः चे मत इतरावर लादणे मुळीच नाही. हा प्रत्येक विषयावर आपण आपले मत मांडु शकतो. आपले मत लिखाण, भाषण, सभा या माध्यमातून व्यक्त करू शकतो. परंतु मत व्यक्त करताना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही देशहीताला धोका निर्माण होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक असते. लोकशाही मध्ये लोकांनी कसे रहावे यासाठी संविधान आहे. संविधानाने सर्व नियम नियमावली घालुन दिलेली आहे. फक्त संविधान वाचुन ते समजून घेऊन संविधाना नुसार वागण्याची नितीमत्ता



लोकांची पाहिजे. धर्माचे सार्वजनिक ठिकाणी पालन करणे म्हणजे लोकशाही मुळीच नाही. सार्वजनिक ठिकाणी प्रत्येक जन भारतीय पाहिजे आणि त्यांचे वर्तन फक्त आणि फक्त संविधानानुसार पाहिजे. धर्म ही वैयक्तिक बाब असल्याने ती घराच्या आत, वैयक्तिक पातळीवर अमलात आणण्याची बाब आहे. म्हणून धार्मिक चालीरीती, चुकिच्या व अंधविश्वास पसरवणाऱ्या भाकडकथा या सार्वजनिक ठिकाणी मांडणे लोकशाही विरोधी आहे. सार्वजनिक ठिकाणी राष्ट्रहित व जनहितच आवश्यक असते. धर्माच्या नावाखाली अंधविश्वास आणि चुकिच्या चालीरीती जोपासल्या जात असतील आणि त्याला वैचारिक पातळीवर विरोध होत असेल तर चुकीच्या किंवा अंधविश्वास पसरवणाऱ्या लोकांना अधिकार आहे असे म्हणणे म्हणजे कोणाकडे तरी बुद्धी व मेंदु गहाण ठेवल्या सारखे होय. स्वतः चा मेंदु इतरांकडे गहाण ठेऊन तत्वज्ञानाच्या गप्पा मारणे म्हणजे निव्वळ टाईमपास होय. लोकशाही च्या नावाखाली सार्वजनिक ठिकाणी धर्माची चर्चा होत असेल किंवा धर्मीक विधी होत असेल तर इतर धर्मांवर हा अन्याय आहे. कारण लोकशाही म्हणजे एकाच धर्माला मोठ समजून, एकाच धर्माची उपासना करून इतरांना डावलणे मुळीच नाही. एखाद्या धर्मातील पूजनीय बाब इतर धर्मात मान्यच नसेल तर अशा वेळी वाद होण्याची शक्यता असते. म्हणुन लोकशाही आहे म्हणजे आम्ही काहीही करू शकतो, आमच्या मनाने अर्थ काढु शकतो हे मुर्खपणाचे व बौद्धिक बेईमानी चे लक्षण आहे. एखाद्या धर्मातील लोक धर्म विसंगत बाबी करत असतील तर त्या व्यक्तीला धर्मातील इतर व्यक्ती बोलु शकतात. त्याला धर्माची वैयक्तिक पातळीवर जाणीव करून देऊ शकतात परंतु स्वधर्मीय लोकांनी सांगीतलेले ऐकायचे की नाही हा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. परंतु एखादा व्यक्ती स्वधर्मविरोधी काम करत असेल, त्याचा धर्मातील लोक त्या कृत्याला विरोध करत असतील तेव्हा धर्म विरोधी कृत्याला विरोध करणाऱ्यांना ईतर धर्मीयांना चुकीचे बोलण्याचा अधिकार नाही. प्रत्येकाने आपल्या धर्माचा प्रसार प्रचार करावा, इतर धर्मातील चुकिच्या रुढी परंपरा अंधविश्वास यावर मतही मांडावे परंतु लोकशाही च्या नावाखाली चुकिच्या गोष्टी लादणे हे नैतिक दृष्टीने योग्य नाही. लोकशाही च्या नावाखाली धर्म जात किंवा चुकिचे विचार पेरल्या पेक्षा राष्ट्रहित जोपासुन देशात बंधुता नांदेल याची काळजी घेणे आवश्यक आहे. देशातील जनता समस्या ग्रस्त आहे. मजुरांना काम नाही, शेतकऱ्यांना मालाला भाव नाही, शिक्षण, आरोग्य सुविधा शेवटच्या घटका मोजत आहेत. बेरोजगाराची फौज निर्माण झाली आहे. या गंभीर बाबी देशात आहेत.

लोकशाहीमध्ये सरकार लोकांचे असते आणि लोकांच्या समस्या सोडवणे आवश्यक असते. आज शिक्षण, आरोग्य, बेरोजगारी, महागाई, शेतमालाला भाव, हाताला काम ह्या धर्माच्या जातीच्या नाही तर माणसांच्या समस्या आहेत. यासाठी सर्वांनी एकत्र येऊन सर्वांना न्याय देण्यासाठी आपला लढा मजबूत करणे म्हणजे लोकशाही होय. लोकशाही म्हणजे मतासाठी जनतेसमोर मताची भिक माघुन स्वतः च्या पिढ्यांन पिढ्यांची कमाई करणे नव्हे तर तळागाळातील लहानात लहान घटकांचा सर्वांगीण विकास करणे होऊ. शिक्षण, आरोग्य, रोजगार यापासुन देशातील कोणताही व्यक्ती उपेक्षित राहणार नाही व देशातील ध्येयधोरणे हे केवळ लोकांच्या हितांचे असतील आणि लोकांना अपेक्षित च ध्येय धोरणे आखले जातील म्हणजे लोकशाही होय. लोकांच्या स्वातंत्र्यावर व मुलभूत हक्कावर कोणत्याही बंधने न आणता प्रत्येक नागरिकांना माना सन्मानाने, स्वाभिमानाने निडर जगने म्हणजे लोकशाही होय. म्हणून ज्यांच्या डोक्यात विषमता आहे, अंधविश्वासाची घाण आहे, माणसा माणसा बद्दल द्वेष आहे, न्यायाची व मानवतेची नितीमत्ता नाही अशा बुद्धीहीन लोकांनी स्वतः मताने लोकशाहीचा अर्थ काढून चुकिचा प्रचार करणे थांबवने आवश्यक आहे. लोकशाही चे नाव घेऊन चुकीचे वर्तन करणाऱ्यांना लोकशाहीचे व संविधानाचे पालन करून सत्य बोलुन देशहीत व जनहित जोपासणारे लोक खटकतात. ही शोकांतिका आहे. लोकशाही चे नाव घेऊन उदाहरणे देण्याआधी लोकशाही समजून घेऊन दाखले दिले तर आपली बौद्धिक पातळी लक्षात येते. सोशल मिडिया वरून अर्धवट व चुकिची माहिती घेऊन स्वतः ला विद्वान समजणारे लोक आयुष्यात स्वतः चेच नुकसान करत आहेत ह्याची जाणीव त्यांना आज होत नाही. आज स्वतः, स्वतः च्या मुलांच्या भविष्यासाठी न लढता घरात बसणारे माणसिक गुलाम लोक गप्प आहेत. उद्या याच लोकांची मुलं इतरांची गुलामी करतील तेव्हा मात्र वेळ निघून गेलेला असेल. म्हणून सर्वांगिण विकासासाठी व जनकल्याणासाठी अगोदर लोकशाही समजून घेणे आवश्यक आहे.



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

## जो मोठा असतो त्याला प्रदर्शन करावं लागत नाही

आधुनिक केसरी

**खरा मोठेपणा झाकत नाही आणि खोटा मोठेपणा फार काळ टिकत नाही तो कधी ना कधी तरी उघडा पडतोच मग मोठेपणाच प्रदर्शन करण म्हणजे सुद्धा वेडेपणा आहे. तरी देखील हाच वेडेपणा अचाट आणि अफाट प्रमाणात करण्याचा प्रयत्न मनुष्य करत असतो. सत्य हे फार काळ लपुन राहत नाही जो व्यक्ती वास्तविक मोठा आहे तो कधीच मिथ्य मोठेपणा मिळवण्यासाठी धडपडत नाही. जो साक्षात मोठा आहे त्याला मी मोठा आहे हे दाखवण्याचा मिरविण्याचा अथवा सिद्ध करण्याचा प्रयत्न करावा लागत नाही. या उलट जो वास्तविक मोठा नसतो त्याला मात्र क्षणोक्षणी पदोपदी पावलो पावली मी मोठा आहे. माझा मोठेपणा पाहा यासाठी वांरवार घडपड करावी लागते.महणजे जे सत्य असतं ते स्थिर असत मजबुत असतं परिपक्व अढळ असतं.**

जे खोटं असतं ते अपरिपक्व, अस्थिर, बैचेन, सदैव चंचल, असतं. तर स्थिर सत्य हे कधीच विचलित डळमळीत होत नाही. म्हणून जो वास्तविक मोठा असतो. तो आपला मोठेपणा दाखवत नाही.अथवा त्याला तो दाखवण्याचा मोह देखील होत नाही.म्हणून मोठेपणा असणं आणि नसताना आहे हे दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न करणं ह्या वेगवेगळ्या बाबी आहेत. मी मोठा आहे हे प्रत्येकाला वाटण वेगळं असतं आणि असणं वेगळं असतं म्हणून समजणं आणि वास्तविक असणं यामध्ये जमिन असमानच अंतर असतं.नदी, नाला, विहीर, तलाव, यापैकी सर्व जण आपण स्वतः समुद्र आहेत असं समजू शकतात. समजण्याचा प्रयत्न करून तसं भासवतात पण लोक त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करतात. कारण समजुन न समजल्या सारखं करणं हा लोकांचा स्वभाव असतो. आपण स्वतःला काहीही समजू शकतो समजण्यात काही गैर नाही. नसताना दाखविण्यासाठी जी काही केवीलवाणी धडपड वाट्याला येते ती मात्र भायनक असते. आपलं अस्तित्व इतरांना दाखविण्यासाठी धडपड करण्या ऐवजी अस्तित्व सिद्ध करा लोक आपोआप ओळखतील पण असं न करता आपण मात्र उलट्या दिशेने मार्गक्रमण करत असतो. विवेक बुद्धी हि योग्य पातळीवर असेल तर चुकुन सुद्धा असं घडत. समुद्राला कधी सांगावं लागतं नाही मी समुद्र आहे. तळयाने विहीरीने नाल्याने किती ही धडपड केली. आकांडतांडव केले कि आम्ही समुद्र आहोत तरी सुद्धा फार फरक पडत नाही. कारण वाटलं म्हणून म्हटलं म्हणून समुद्राची उंची गाठता येईल का ? तर नक्कीच नाही कारण समुद्र हा समुद्र आहे तो विशालकाय आहे . सुर्यमालेतील मुख्य गृह सुर्य हा सुर्य आहे.आता तारंगणातील अनेक गृह तारे हे जर म्हटले आम्ही स्वतः सुर्य आहोत तर फार काही उपयोग होणार नाही .कारण सुर्य हा सुर्य आहे आणि सुर्याला स्वतःचा मोठेपणा सांगण्याची आवश्यकता भासत नाही. कारण समुद्र आणि सुर्य यांचं कार्य विशालता उंची एवढी मोठी आहे कि मोठेपणा सुद्धा खुजा पडेल. असंच काहीसं आज काल आपल्या अवतीभवती सगळीकडे पाह्यला मिळत आहे .सर्व साधारण पणे सर्वच क्षेत्रात एक नवीन स्पर्धा सुरू झाली आपणच सगळ्यात मोठे व्यक्तिमत्त्व कसे आहेत .असं सर्वसाधारण पणे प्रत्येकाची धारणा मानसिकता निर्माण झाल्याने त्याच प्रकाटीकरण प्रदर्शन करण्याची प्रचंड स्पर्धा लागली आहे.



हे प्रदर्शन व्यसनाच स्वरूप धारण करत आहे. आपण स्वतः सोडलो तर मग या क्षेत्रात इतर कोणीही आपल्या पेक्षा मोठा नाही न्युनगंड निर्माण झाला कि अंहकार उफाळून येतो. त्यामधुन द्वेष निर्माण होतो. खरं खोटं चांगलं वाईट हितकारक अहितकारक मग काही कळत नाही. मन बुद्धी ही मीच कसा मोठा आहे हा अभास टिकण्यासाठी प्रचंड तणावाखाली असते.मग हे सगळं आपण स्वतः निर्माण करुन दुःख ओढावून घेतो आहेत वास्तवात असं करण्याची आवश्यकता नाही. वास्तविक सिकंदर ने जग जिंकल आणि शेवटी आत्महत्या केली.जग जिंकून काय उपयोग झाला. शेवटी व्यक्तीचा मोठेपणा हा त्यांच्याकडं असलेल्या विनम्रतेवर , दुसर्याच्या प्रति असणारा जो आदरभाव आहे त्यावर तसेच आपल्या सोबत असणारा व्यक्ती याला छोटेपणाची जाणीव होऊ न देणे स्वतः कडे लघुतव घेता येण यावर असते .समोरच्या व्यक्तिमत्वा मध्ये मोठेपणा पाहण्याची विशालता असली पाहिजे. तेव्हा कुठे लोक त्या व्यक्तीला मनातुन मोठा समजतं असतात सध्या लोक हुशार आहेत .समोर खोटा खोटा मोठेपणा देतात आणि मागे पार चक्क धुलाई करतात .हा कसला मोठेपणा मोठेपणा हा समक्ष नाही तर परोक्ष व्यक्त होणारी बाब आहे.महणुन आपण मोठे आहोत हे दाखविण्यासाठी प्रकाट करण्यासाठी धडपड करण्या ऐवजी जितकं जमेल तितकं चांगलं कार्य करण कधीही उत्तम असत.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# जातीय सलोखा बिघडवणाऱ्या नेत्यांवर भाजपाचे लक्ष

## मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार ॲड. आशिष शेलार यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यामध्ये काही विशेष पक्ष, गट आणि त्यांचे विशेष नेते हे महाराष्ट्रातील जाती -जातीमध्ये विसंवाद निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी काही पक्ष, काही गट आणि काही नेते आणि काही गटाचे नेते हे राज्यातलं जातीय सलोख्याचे वातावरण बिघडवण्याचा तर प्रयत्न करत नाहीत ना याची माहिती आजच्या बैठकीत घेण्यात आल्याचे मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार ॲड आशिष शेलार यांनी सांगितले.
दादर वसंत स्मृती येथे आज भाजपा महाराष्ट्र पदाधिकारी आणि जिल्हाध्यक्षांची महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीचा प्रारंभ प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत झाला. या बैठकीत लोकसभा निवडणुकीचे नियोजन डोळ्यासमोर ठेवून केंद्र स्तरावर ठरलेल्या रचनेसंबंधीचे मार्गदर्शन राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांनी केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




यांनीही या बैठकीत मार्गदर्शन केले. या बैठकी विषयीची माहिती मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार ॲड आशिष शेलार यांनी माध्यमांना दिली यावेळी पक्षाचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यावेळी उपस्थित होते. यावेळी आमदार ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले की, प्रदेश पदाधिकारी आणि जिल्हाध्यक्षांची संपूर्ण राज्याची महत्त्वाची पूर्वनियोजित बैठक एका विशिष्ट कालावधीनंतर सातत्याने आम्ही घेत असतो यामध्ये राज्यभरातील राजकीय घडामोडी, संघटनात्मक बांधणी, केंद्राचे आणि स्थानिक कार्यक्रमाचे नियोजन आणि या सगळ्यातून भाजपा संघटना रचनेच्या आधारावर सामान्य माणसाची सेवा अजून चांगली कशी करता येईल यासंबंधीचा आढावा अशा बैठकांमध्ये घेण्यात येतो.
देशातील महिलांना आरक्षण देणारे विधेयक मांडून ते लोकसभा आणि राज्यसभेत मंजूर केल्याबद्दल आजच्या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानणारा ठराव मंजूर करण्यात आला. हा ठराव प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक यांनी मांडला. महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्राताई वाघ यांनी या ठरावाला अनुमोदन दिले. प्रत्येक बैठकीत मागील काळातील कार्यक्रमांचा आढावा घेण्यात येतो. काही विशेष कार्यक्रम घेऊन भाजपा शासकीय यंत्रणेसोबत संघटक म्हणून उतरली आहे. बूथ सशक्तिकरण, मेरी माटी मेरा देश अशा सगळया कार्यक्रमांचा आढावा व आगामी नियोजन याबाबतही चर्चा करण्यात आल्याची माहिती आमदार ॲड आशिष शेलार यांनी दिली. राज्यांमध्ये महाविजय 2024 हा एक विषय घेऊन आम्ही उतरलो यामध्ये लोकसभेच्या 45 पेक्षा अधिक जागा जिंकण्याच्या दृष्टीने कार्यरत होणे, सध्याची राजकीय परिस्थिती आणि आपल्या भूमिका काय असल्या पाहिजेत या बद्दलचे मार्गदर्शन आजच्या बैठकीत करण्यात आले. काही पक्ष व गट राज्यातील जातीय सलोख्याचे वातावरण बिघडवण्याचे काम करत आहेत. याबद्दल आजच्या बैठकीत चिंता व्यक्त करण्यात आली. भाजपा, मा. एकनाथ शिंदेजी, देवेंद्रजी आणि मा. अजितदादा पवार आणि सहकारी पक्ष यांच्या नेतृत्वाचे महायुतीचे सरकार 'सबका साथ सबका विकास 'चा नारा देऊन काम करीत आहे. त्यातून जातीय सलोखा राखला जावा, प्रत्येकाला न्याय मिळाला पाहिजे यासाठी आम्ही काम करीत आहोत. पण समाजातील सलोखा बिघडवणारे पक्ष, गट आणि त्यांचे नेते यांना सडेतोड उत्तर महाराष्ट्रातील सर्व जनतेला बरोबर घेऊन देण्याच्या दिशेने भाजपाची यंत्रणा काम करत आहे, याची माहिती योग्य वेळेला प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे देतील, असे सुतोवाचही आमदार ॲड आशिष शेलार यांनी केले.

# सरकारने जाहीरर केलेली मदत तुटपुंजी, शेतकऱ्यांना भरीव मदत द्या : प्रसेनजीत पाटील

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** जळगाव जामोद तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या वतीने मा. प्रसेनजीत पाटिल यांच्या नेतृत्वात ४/१०/२०२३ बुधवार रोजी या वर्षी झालेल्या अतिवृष्टिमुळे शेतकर्यांचे प्रचंड नुकसान झाले, हजारो हेक्टर जमिनी खरडून गेली त्यामुळे जळगांव जामोद, संग्रामपुर तालुक्यातील शेतकरी हवालदिल झालेला आहे. नुकसान होऊन २ महिने झाले तरी अध्याप कुठलीही आर्थिक मदत शेतकर्यांना झालेली नाही. चालू वर्षाचा २५ टक्के विमा तात्काळ मंजूर करण्यात यावा. खरडून गेलेल्या शेतीची मदत तात्काळ जमा करण्यात यावी. जळगांव जामोद शहरातील नदी काठावरील वंचित लोकांना सानुग्रह अनुदान वाटप करण्यात यावे. सोयाबीन पिकावर आलेल्या एलोमोझक प्रादुर्भावामुळे प्रचंड नुकसान झाले आहे त्याचे पंचनामे करुन शासनाने आर्थिक मदत जाहिर करावी या मागण्यांसाठी एकदिवसीय धरणे आंदोलन करुन उपविभागीय अधिकारी जळगांव जामोद यांना निवेदन देण्यात आले. सदर आंदोलनाला शिवसेना,कॉंग्रेस, वंचित, एमआयएम, वन बुलढाणा नेशन, रिपाई गट यांच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष प्रसेनजीत पाटिल, युवक जिल्हाध्यक्ष पराग अवचार, अल्पसंख्यांक कार्याध्यक्ष एम.डी.साबीर, तालुकाध्यक्ष प्रमोद सपकाळ, कार्याध्यक्ष महादेव भालतडक, करीम खान, विश्वास भालेराव, विठ्ठल वाघ, सौ.वर्षा वाघ, सौ.सविता देशमुख, मोहसिन खान, रामेश्वर मानकर, एकनाथ ताठे, दादाराव धंदर, वामन गुडेकर, श्रीकृष्ण जाधव, सुरेश पाचपोर, राजू अवचार, तुकाराम वाघ, दत्ता डिवरे, ईरफान खान, बबलु जाने, योगेश कुंवर, बंटी शंकपाल, दिलीप वसतकार, मंगल डोंगरदिवे, जनार्धन वाघमारे, अताउल्लाह पठान, संजय चोपडे, राजु जाधव, सिध्दार्थ हेलोडे, ताहेर माही, जावेद छोटु, शेख जाकिर,





# रायपूर येथे साखळी उपोषण सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** सेलू तालुक्यातील रायपूर येथे मराठा समाजाला जोपर्यंत आरक्षण मिळत नाही तो पर्यंत सकल मराठा समाजाच्या वतीने सेलू तालुक्यातील रायपूर येथे साखळी उपोषण सुरू आहे. मात्र १४वा दिवस उलटूनही शासनाकडून अद्याप कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्याने येथील ५ मराठा समाज बाधवांनी एकदिवसीय अन्नत्याग केला. यामध्ये सोमेश्वर गाडेकर, शेषेराव गाडेकर, प्रकाश गाडेकर, मुरलीधर गाडेकर, आणि विष्णुपंत गाडेकर यांचा समावेश आहे. त्याचबरोबर आरक्षण मिळेपर्यंत राजकीय नेत्यांना यापुढे गावामध्ये घेण्यास प्रवेशबंदी केली आहे. या उपोषणास मुस्लिम बांधवांनीही पाठिंबा दिला आहे.




महाराष्ट्र Business Katta

तिरुपती मंडप डेकोरेटर्स
Generator, Lighting, Mandap, Open Mandap, DJ Sound, Stage, Chairs & Garden Decorate
Baiju Anna
8623904312
Abhijeet Shukla
9765826252
DARZI BAZAR, CANTONMENT, CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

अर्जंट पाहिजेत
बॅक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वतःची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958






# उदासीनतेचे मळभ दूर करणारे साहित्यसंमेलन

आधुनिक केसरी

**साहित्य आणि समाज यांचा अन्योन संबंध असतो. साहित्य लोकांना जोडण्याचे कार्य करीत असते म्हणूनच साहित्य संमेलने ही साहित्याचा कुंभमेळाच असतो. साहित्य संमेलन हे अखिल भारतीय असो की विभागीय असो लोक मोठ्या श्रद्धेने आणि साहित्यावरील अतिव प्रेमाने एकत्र आलेली असतात. शिरूर अनंतपाळ... लातूर जिल्ह्यातील एक तालुक्याचे ठिकाण तालुका जरी असला तरी या गावानं आपलं गावपण मोठ्या निगुतीन जपून ठेवलंय. हे गावपण म्हणजे येथील आत्मीयता आणि रसिकता. या दोन सद्गुणांच्या बळावर या मंडळीनी घडवून आणलेले साहित्य संमेलन खऱ्या अर्थाने मायमराठीच्या दरबारातील अनोखा अक्षरोत्सव ठरला. शिरूर अनंतपाळचे साहित्य संस्कृती संवर्धन मंडळ म्हणजे साहित्यिक उपक्रमांची एक चळवळ आहे .**

साहित्य विषयक उपक्रमांची सातत्याने आखणी करुन त्यात सातत्य व दर्जा ठेवणाऱ्या या मंडळाच्या या संस्थेने या संमेलनाच्या आयोजनात कुठलीही कसूर ठेवली नाही. या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक धनंजय गुडसूरकर हे होते. लेखणी आणि वाणीवर प्रभुत्व असणाऱ्या गुडसूरकर यांनी साहित्य चळवळीत दिलेले योगदान फार मोठे आहे. गुडसूरकर यांची संमेलनाध्यक्ष म्हणून निवड करून संयोजन समितीने संमेलनाच्या यशस्वितेचा पाया रचला. ग्रामीण भागातही साहित्यावर प्रेम करणारे लोक पहावयास मिळतात तेव्हा साहित्यावरील आपली निष्ठा अधिक वाढायला लागते. साहित्य संमेलन म्हटलं की ग्रंथदिंडी आलीच. ग्रामीण भागातील लोकांना देवाची पालखी माहित आहे, साहित्याची पालखी आणि त्याची दिंडी ग्रामीण भागात पहायला मिळणे ही खरंच अद्भुत गोष्ट आहे. सकाळच्या रम्यप्रहरी निघालेली साहित्यदिंडी ही साहित्यावरील आपली श्रद्धा व्यक्त करणारी दिंडी ठरली. लहान, थोर ,शेतकरी, शेतमजूर, शाळकरी विद्यार्थी , शिक्षक, व्यापारी, राजकारणी ,तरुण मुले मुली या दिंडीमध्ये सगळेच साहित्यावरील भक्तीत नाहून निघाले होते. ग्रंथदिंडी मोरया लॉन्स मधील स्वामी रामानंद तीर्थ साहित्य नगरीत पोहोचली. ग्रामीण भागातही भव्य अशी व्यवस्था केली होती. शिरूर अनंतपाळचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे रसिकतेने संपन्न असलेला श्रोतवर्ग व सातत्याने साहित्य सांस्कृतिक उपक्रमांची आखणी करणारे गाव अशी ओळख आहे. स्वामी रामानंद तीर्थांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून थाटामाटात साहित्य संमेलनाचे उद्घाटन झाले.

ऐतिहासिक वारसा या गावाला लाभलेला आहे. हैदराबाद मुक्ती संग्रामात भोजराज पाटील यांचे हैदराबाद मुक्तिसंग्रामामध्ये जे योगदान आहे ते कोणीही विसरू शकत नाही. या साहित्य संमेलनाचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणते वेळेचे नियोजन . उद्घाटन सत्रापासून ते समारोपापर्यंत वातावरण पाहून , संमेलनाचा थाटमाट पाहून, साहित्यावरील लोकांची आस्था अगदीच वाखाणण्याजोगी !

मराठवाडा साहित्य संमेलन ज्याप्रमाणे संपन्न होते त्याप्रमाणे या विभागीय साहित्य संमेलनाची आखणी व व्यवस्थापन साहित्य संस्कृती आणि संवर्धन मंडळाने केली . या मंडळांनी मराठवाडा साहित्य परिषदेची शाखा स्थापन करावी व पुढे मसापचे मराठवाडा साहित्यसंमेलन घ्यावे अशी सूचना संमेलनाध्यक्ष धनंजय गुडसूरकर यांनी केली . या संमेलनाचे अध्वर्यु प्रभाकरराव गुरुजींनी त्याला होकार दर्शविला तर संमेलनाचे उदघाटक आ .



संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी स्वागताध्यक्ष होण्यासाठी दिलेली स्विकृती ही या साहित्य संमेलनाची मोठीच उपलब्धी म्हणायला हवी.स्वामी रामानंद तीर्थ यांचे मराठवाडा मुक्ती संग्रामातील नेतृत्व व त्यांचे कार्य डॉ. सोमनाथ रोडे यांनी आपल्या भाषणातून साक्षात उभे केले. त्यानंतर झालेल्या कवी संमेलनात खरी रसिकता दिसून आली. समारोपाच्या सत्रात झालेल्या ठरावातील महत्वाचा ठराव म्हणजे स्वामी रामानंद तीर्थ यांना मरणोत्तर भारतरत्न द्यावा हा ठराव. याशिवाय मुक्तीसंग्रामाचा अभ्यासक्रमात समावेश व्हावा हा ठरावही तेवढाच महत्वाचा. साहित्यप्रेमींसाठी भोजनाची केलेली व्यवस्था असो चहापान असो किंवा साहित्यिकांची सरबराई असो हे तर अभूतपूर्व होते. अध्यक्षांचा मानपान साहित्यिकांचा मानपान कुठेच कमतरता नव्हती. यजमान संस्थेने या संमेलनासाठी जीव ओतून कार्य केले. साहित्य रसिकांना मिळालेली साहित्यिक मेजवानी म्हणजे जीवन ऊर्जा होय. इथे मिळालेली वैचारिक शिदोरी ही भविष्यातील वाटचालीसाठी दिशादर्शकच ठरेल म्हणूनच छोटी छोटी साहित्य संमेलने ही काळाची गरज आहे व साहित्य प्रेमींनी एकत्र येऊन अशी साहित्य संमेलने भरविली की रसिकता आणि साहित्यिक संपन्नता निर्माण व्हायला वेळ लागणार नाही. संमेलनाचे स्वागताध्यक्ष व जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष ॲड. संभाजीराव पाटील, प्रभाकरराव कुलकर्णी गुरुजी, भारतराव कोंडेकर, बालाजी येरोळे, शिवाजी मादलापूरे गुरुनाथ शिंदाळकर धनाजी लखनगावे किरण कोरे बालाजी जाधव प्रा. कुमार बंडे अशा अनेक हातांनी हे संमेलन तोलून धरलं आणि संमेलनाचा मांडव उभा राहिला. ही काही नावं झाली पण धडपडणाऱ्या प्रत्येक शिरूर अनंतपाळकरांची धडपड यामागे राहिली. लातूर जिल्हा सोडला तर मराठवाडा मुक्तीसंग्रामाच्या अमृत महोत्सवाच्या निमित्तानं मराठवाडभर लक्षणीय असं काही झालं नाही. शासकीय आणि अन्य पातळीवर असे उदासीनतेचे मळभ दाटून आलेले असताना शिरूर अनंतपाळ नगरीत झालेला हा अक्षरोत्सव या मळभांना दूर करणारा ठरला. क्रांती नेहमी शस्त्रांनीच होते असं नाही ती अक्षरांनीही होते हे या संमेलनाने सिद्ध केले.

डॉ. दीपक चिद्दरवार
7709427707

# दांभिकांची पंढरी उद्ध्वस्त करणारा पत्रकार संजय आवटे



हेमंत टाले
संपर्क क्र. 9975807632

आधुनिक केसरी

**मित्रांनो सप्रेम जय गुरु निर्भय बनो मंच अमरावती द्वारा आयोजित दिनांक 1/10/2023ला अभियंता भवन येथे प्रेक्षकांनी खचाखच भरलेल्या सभागृहात ज्येष्ठ पत्रकार, लेखक, व्याख्याते संजय आवटे सरांचे भारतीय लोकशाही या विषयावर अत्यंत घनाघाती आणि जोरदार व्याख्यान झाले. या व्याख्यानाला माझी मुलगी स्वागता आणि मुलगा संयम दोघांनाही व्याख्यानासाठी घेऊन गेलो आणि संजय आवटे सरांच्या हस्ते त्यांचच स्वतःच आम्ही भारतीय लोक आणि चंद्रकांत झटाले लिखित मजबुती का नाम महात्मा गांधी हे पुस्तक आवटे सरांच्या स्वाक्षरीनिषी माझ्या मुलांना भेट दिलें. कारण आपल्या पुढच्या पिढीला जर आपला वारसा नीटपणे कळला नाही तर खरा आरसा दिसणार नाही ही वस्तुस्थिती आहे.**

माझ्याच गावातील अंकुश वऱ्हाडे हा होतकरू तरुण बोलता बोलता एकदा मला म्हणाला काका काँग्रेसचे बाकी सगळं ठीक आहे परंतु नेहरूंच मात्र आपल्याला काही पटलं नाही. मी आश्चर्यचकित झालो. म्हटलं काय? तर म्हणाला त्यांचा तो राजेशाही थाट त्यांची राहणी त्यांचं ऐश्वर्य हे सगळं वैभव. मी त्याला म्हणालो तुला हे माहित आहे का? की नेहरूंनी नऊ वर्ष कारावास भोगला होता. त्याचा चेहरा एकदम उतरला आणि माझ्याकडे अवाकपणे पाहतच राहिला काय गोष्ट करता मी म्हटलं हो तो म्हणाला मला काही माहीतच नाही. मी म्हटलं तुमच्यासारख्या तरुणांना आपला वारसा नीट कळू नये यासाठी सध्याच्या सत्ताधाऱ्यांनी कडेकोट बंदोबस्त केलेला आहे. गांधी, नेहरू, आंबेडकर हा वारसा नीट पण कळवा यासाठी अंकुशला सुद्धा व्याख्यानासाठी मी स्वतः घेऊन आलो होतो. 2014 पासून सगळा राष्ट्रीय मीडिया हा सत्तेचा रखेल बनलेला आहे. या सत्ताधाऱ्यांनी भारतातल्या प्रामाणिक पत्रकारांच्या पोटावर लाथ मारून त्यांना नोकऱ्यावरून बाहेर काढण्याचं अत्यंत क्रुर भयंकर षडयंत्र रचलेलं असून अनेक पत्रकार त्याला बळी पडलेले आहे.

मित्रांनो वारसा नीटपणे कळला नसल्यामुळे आजचा आपला आरसा हा भयंकर आहे. विचित्र आहे. विद्रूप आहे. विकृत आहे. त्यासाठी एकच उदाहरण देईन. अलीकडेच अमेरिकेमध्ये आपल्या देशाचे पंतप्रधान दौऱ्यावर असताना तिथे आपल्या देशाच्या पंतप्रधानाच्या विरोधात जोरदार निदर्शने करण्यात आली. अमेरिकेसारख्या देशात भारताचे पंतप्रधान दौऱ्यावर असताना त्यांच्या विरुद्ध निदर्शने करण्यात येत असल्याची ही घटना ऐतिहासिक आहे. एवढेच नाही तर अमेरिकेच्या 75 संसद सदस्यांनी अर्थात तिथल्या लोकप्रतिनिधींनी आपल्या भारत देशाच्या पंतप्रधानाच्या स्वागत समारोहाच्या कार्यक्रमावर जाहीर पणे बहिष्कार टाकला. भारताच्या इतिहासात आजपर्यंत कुठल्याही पंतप्रधानाची अशी नाचक्की झाली नाही. आपल्या देशासाठी ही अत्यंत लाजिरवाणी घटना म्हणावी लागेल. हा आपला आजचा खरा आरसा आहे. परंतु हा आरसा भारतातल्या राष्ट्रीय मीडियाने आपल्यापर्यंत पोहोचूच दिला नाही. पंतप्रधानांना प्रश्न विचारला की भारतातल्या अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेसाठी तुम्ही काय उपाययोजना करणार आहे. तेव्हा उत्तर दिलं लोकशाही हमारे रघो मे है तेव्हा अमेरिकेतील पत्रकार हसत होते. प्रश्न विचारला काय उत्तर दिलं काय पंतप्रधानांची अमेरिकेत झालेली फोत्री नामुष्की भारतातल्या राष्ट्रीय मीडियाने या बातम्या कुठेही दाखवल्या नाही ही माहिती भारतीय जनतेच्या या कानाची त्या कानालाही कळू नये यासाठी कडेकोट बंदोबस्त जर या देशाचं सरकार करत असेल तर लोकशाही खरंच जिवंत आहे का? असा प्रश्न माझ्या सकट आपल्या सगळ्यांना पडला पाहिजे. खरी माहिती जनसामान्यांपर्यंत पोहोचू न देण्यासाठी हुकूमशहा जिवाचा आटापिटा करत असतो. आपले पंतप्रधान हे खोटारडे आहेत यात तिळमात्र शंका नाही. झूट को हमेशा डर होता है अस म्हणतात आणि



म्हणून आपली कर्तृत्वहीनता आपला फेलीवर आपलं अपयश लपवण्यासाठी ते या देशातल्या जनतेला वेगवेगळे भ्रम घडवत असतात. महाराष्ट्र हा कोरोना पसरवणारा सुपर स्प्रेडर आहे असा भ्रम त्यांनी कोरोना काळात महाराष्ट्राच्या जनतेला घडवला होता.त्याचबरोबर कोरोना हे मुस्लिमांनी हिंदूंच्या विरुद्ध पुकारलेलं एक धार्मिक युद्धच आहे हा ही एक भ्रम त्यांनी घडवला होता. भारतात मुसलमानांची संख्या ही 15 टक्के आहे आणि नोकरीमध्ये त्यांचं प्रमाण हे 2.5% आहेत ही वस्तुस्थिती असताना सतत इथल्या तरुणांची माथीभडकवायची सतत त्यांच्या डोक्यांमध्ये मुस्लिम द्वेष पेरायचा दंगल सदृश्य परिस्थिती निर्माण करायची आणि अशा अत्यंत घातक आणि विषारी वातावरणाला अमृत काल घोषित करायचं हाही एक भ्रमच आहे. गेली नऊ वर्षे भारतातली जनता ही सतत एका आभासी जगामध्ये वावरत आहे. संजय आवटे सरांचं व्याख्यान मात्र या भ्रमातून वास्तव्याकडे नेणार होतं. ते म्हणाले माझे एक पुस्तक आहे बाप पळवणारी टोळी आपल्याला वारसा नाही तर दुसऱ्यांचा वारसा पळवायचा महापुरुष पचवून टाकायचे पावणे दोन तासांचं आवटे सरांचं व्याख्यान म्हणजे लोकशाही या विषयावर दिवसभराचं प्रशिक्षण होतं असचं म्हणाव लागेल. काँग्रेस सहित सर्वच पक्षाच्या राज्यकर्त्यांना आवटे सरांनी अक्षरशः धो धो धुतलं. काँग्रेसची सत्ता जाणे हे क्रमप्राप्तच होतं कारण त्यानी लोकशाही गृहीत धरली होती असंही ते मुक्तपणे बोलले. काँग्रेस सत्तेवर असताना आम्ही काँग्रेसला रोज ठोकत होतो. परंतु त्यांनी आम्हाला कधीही पाकिस्तानला जा असं म्हटलं नाही. अशी जोरदार मांडणी आवटे सरांनी केली. मित्रांनो पत्रकार जेव्हा मुक्त असतो तेव्हाच देशांमध्ये खऱ्या अर्थाने लोकशाही असते. या देशातील शेकडो इमानदार पत्रकारांच्या पोटावर पाय देऊन आजचा हुकूम शहा (कृपया कुठल्याही शहाचा या शहाशी संबंध जोडू नये) लोकशाहीला वाकोल्या दाखवत आहे. गांधी नेहरू आंबेडकर बरोबर भारत ही आवटे सरांची मांडणी म्हणजेच खरी भारताची कल्पना आहे. आणि भारताची कल्पनाच मारून टाकल्या जात आहे असंही आवटे सर म्हणाले. आणि म्हणून सत्ताही मगरूर असते सत्ताही माजोरडी असते आणि सत्ताधारी हा घमंडी असतो दांभिक असतो अशा दांभिकांची पंढरी उध्वस्त करणारा खरा पत्रकार म्हणजे संजय आवटे होय.

# कंजूस माणूस

आधुनिक केसरी

एकदा एक कवी श्रीमंत माणसाकडे गेला. तिथे त्याने आपल्या सर्व कविता गावून दाखविल्या आणि आशा केली की तो श्रीमंत माणूस आपल्याला काहीतरी उत्तम बक्षिस देईल. परंतु तो श्रीमंत माणूस 'अतिशय कंजूस' होता तो म्हणाला, 'माझ्या प्रिय कवीमित्रा, मी तुझ्या कविता ऐकून खुश झालो आहे. तू उदया परत ये, मी तुला खुश करून टाकेल.' उदया मला नक्कीच काहीतरी चांगले बक्षिस मिळेल, या आशेने कवी आनंदाने घरी गेला. दुसऱ्या दिवशी, ठरलेल्या वेळेत न चुकता तो त्या श्रीमंत माणसाच्या घरी गेला. तो श्रीमंत माणूस बोलला, 'सन्माननिय कवीराज, तू मला तुझ्या कवीता पठण करून दाखविल्या व खुश केले, मी पण तुला आज माझ्या घरी बोलवून खुश केले आहे.' प्रत्यक्षात तू मला काहीही दिलेले नाही, त्याचप्रमाणे तुलासुध्दा काहीच मिळणार नाही. आता, आपला व्यवहार संपला आहे. तो कवी खूप निराश झाला. त्याने घडलेला सर्व प्रकार त्याच्या जवळच्या मित्राला सांगितला. त्याच्या मित्राने ही सर्व हकिगत बिरबलकडे कथन केली. हे सर्व ऐकून बिरबल बोलला, 'मी सांगतो तसे कर, तू त्या श्रीमंत माणसाकडे जा आणि त्याला घरी जेवणाचे आमंत्रण दे तसेच तुझ्या कवी मित्राला पण बोलव. अर्थातच, मी पण तिथे असेल. काही दिवसानंतर बिरबलने ठरविलेल्या योजनेप्रमाणे जेवणाचा कार्यक्रम ठरला. आधी ठरल्याप्रमाणे तो श्रीमंत माणूस जेवणाच्या कार्यक्रमाला वेळेवर पोचला. तेव्हा बिरबल कवी व अन्य मित्र एकमेकांबरोबर बोलत होते. वेळ जात होती तरीपण जेवण वाढले गेले नाही सर्व पाहुणे एकमेकांत गप्पा मारण्यात व्यस्त होते. शेवटी त्या श्रीमंत माणसाचा संयम सुटला व तो बोलला, 'जेवणाची वेळ निघून गेली आहे, आपण येथे जेवण्यासाठी आलेलो नाही का?''जेवण? कसले जेवण?' बिरबल बोलला. श्रीमंत माणूस रागात बोलला 'आपण हे काय बोलत आहात, कसले जेवण? आपण येथे जेवणासाठीच एकत्र जमलो आहोत ना?' बिरबल बोलला 'आपणास जेवणाचे असे काही आग्रहाचे आमंत्रण नव्हते, असे सांगितले गेले होते की जेवणाला या.' तो श्रीमंत माणूस नाराज झाला आणि रागात बोलला 'हे काय आहे?' माझ्यासारख्या एका सभ्य माणसाबरोबर लबाडी केली आहे व मला फसविले आहे. बिरबल हसायला लागला आणि बोलला, 'मी अस कधी बोललो की ही वर्तणुक योग्य आहे.' परंतु तू या कवीबरोबर सुध्दा लबाडी केली आहे 'उदया ये म्हणून!' मी पण आपल्याला फक्त खुश करण्यासाठी बोललो कृपया तू पण जेवायला ये. त्या श्रीमंत माणसाला त्याच्या चुकिची जाणीव झाली आणि घरी जाऊन त्याने त्या कवीला योग्य ते बक्षिस दिले व त्याचा सन्मान केला.



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

# सूर्य व चंद्र यांची दोन ग्रहणे याच महिन्यात!

आधुनिक केसरी

**मोसमी वारे परतीला लागल्यानंतर आकाश निरीक्षण करणे अधिक सोयीचे होते. अशा वातावरणातच ऑक्टोबरमध्ये सूर्य व चंद्र अशी दोन ग्रहणे, दोन उल्का वर्षाव, ग्रहांच्या चंद्र व ताऱ्यांसोबत युती, ग्रहांचे उदयास्त आदींची रेलचेल विद्यार्थी, शिक्षक, आकाशनिरीक्षक, शास्त्रज्ञ आणि खगोलप्रेमींसाठी असेल, अशी रास्त अपेक्षा आहे. पृथ्वीवरून पाच ग्रह, पाऊणेपाच हजार तारे आणि ८८ तारका समूह साध्या डोळ्यांनी सहज पाहू शकतो. सद्यःस्थितीत गुरु, शुक्र आणि शनी हे तीन महाग्रह आकाशात अतिशय विलोभनीय दर्शन देत आहेत. महिन्याच्या प्रारंभी बुध कन्या राशीत व शुक्र सिंह राशीत प्रवेश करेल. ता. ३ ऑक्टोबर रोजी मंगळ ग्रहाचा पश्चिमेस अस्त, ता.६ ऑक्टोबरला रात्री ७ वा. इंटरनॅशनल स्पेसस्टेशन दर्शन, ता.७ ऑक्टोबरला बुध ग्रहाचा पूर्वेकडे अस्त होत आहे.**

.७, ८ व ९ रोजी रात्री ड्रेक्रोनिड तारका समूहातून आणि ता.२१, २२ रोजी मृग नक्षत्र समुहातून दरताशी वीस एवढ्या उल्का पडताना दिसतील. ता.१४ ऑक्टोबरला कंकणाकृती सूर्य ग्रहण आहे; ता.२८ रोजी मध्यरात्रीनंतर होणारे खंडग्रास चंद्रग्रहण सुमारे सव्वा तास बघता येईल, हे विशेष उल्लेखनीय! महाराष्ट्रासह उत्तर भारतात कंकणाकृती सूर्यग्रहण दिसणार आहे. महाराष्ट्रात दुपारी ३.०४ वाजेपर्यंत हे सूर्यग्रहण दिसेल. राजस्थान, गुजरात, हरियाणा, उत्तराखंड या राज्यांमधूनही कंकणाकृती सूर्यग्रहण दिसू शकणार आहे. गेल्या सहा महिन्यांत दुसऱ्यांदा भारतातून कंकणाकृती सूर्यग्रहण दिसण्याचा दुर्मिळ योग आला आहे. कंकणाकृती सूर्यग्रहण म्हणजे काय? तर अमावस्येला सूर्य, पृथ्वी आणि त्यांच्या मध्ये चंद्र एका सरळ रेषेत येतात, तेव्हा चंद्रामागे सूर्य झाकला जातो. म्हणजे सूर्याला ग्रहण लागते. ही ग्रहणे तीन प्रकारची असतात, शाळेत याविषयी आपण शिकलो आहोतच. ती अशी खग्रास, खंडग्रास आणि कंकणाकृती सूर्यग्रहणे आहेत. पृथ्वीवरून पाहताना सूर्य पूर्णपणे झाकला जातो त्याला खग्रास सूर्यग्रहण असे म्हणतात. सूर्याचा केवळ काही भाग झाकलेला दिसतो, त्याला खंडग्रास सूर्यग्रहण असे म्हणतात. एरवी चंद्र सूर्यापेक्षा अगदी पृथ्वीपेक्षाही खूपच लहान आहे. पण तो पृथ्वीपासून जवळ आहे. त्यामुळे पृथ्वीवरून पाहताना आपल्याला सूर्य आणि चंद्र आकाराने एकसारखे दिसतात आणि म्हणूनच खग्रास स्थितीत चंद्राचे बिंब सूर्यबिंबाला पूर्णपणे झाकू शकते. पण पृथ्वी आणि चंद्राच्या कक्षा काहीशा लंबगोलाकार आहेत. चंद्र या कक्षेत पृथ्वीपासून दूरच्या बिंदूजवळ असतो, अशा वेळी पृथ्वीवरून चंद्रबिंबाचा आकार सूर्यबिंबापेक्षा लहान दिसतो. याचदरम्यान जेव्हा सूर्यग्रहण होते, तेव्हा चंद्र सूर्यबिंबाच्या मधोमध येतो; पण सूर्य पूर्णपणे झाकला जात नाही, तर एखाद्या कंकणासारखी म्हणजे बांगडीसारखी सूर्याची कडा दिसून येते. त्यालाच कंकणाकृती सूर्यग्रहण म्हणतात. सूर्याच्या या स्थितीला खगोलप्रेमींनी रिंग ऑफ फायर, अग्निवलय, अग्निकंकण अशीही नावे दिली आहेत.

हे ग्रहण वेगळे आहे, कारण एका वर्षात संपूर्ण पृथ्वीवरून किमान दोन ते पाचवेळा सूर्यग्रहणे पाहता येतात. त्यातील एखाद दुसरेच खग्रासग्रहण असते आणि तेही सगळ्याच देशांतून दिसत नाही आणि कंकणाकृती ग्रहण पाहण्याची संधी त्याहीपेक्षा दुर्मिळ असते. भारतातून कंकणाकृती सूर्यग्रहण दिसण्याचा पुढचा योग २१ मे २०३१ रोजी येणार आहे. कंकणाकृती ग्रहणात चंद्राच्या थेट( छायेखाली असलेल्या प्रदेशातच "रिंग ऑफ फायर" दिसून येते. तर त्याच्या आसपासच्या प्रदेशात खंडग्रास ग्रहण पाहायला मिळते. येत्या शनिवार-रविवारी दिसणाऱ्या सूर्यग्रहणाची कंकणाकृती अवस्था यंदा दक्षिण सुदान, इथियोपिया, येमेन, सौदी अरेबिया, ओमान, पाकिस्तान या देशांतील काही भागातून दिसेल. मोसमी वारे परतीला लागल्यानंतर आकाश निरीक्षण करणे अधिक सोयीचे होते. अशा वातावरणातच ऑक्टोबरमध्ये सूर्य व चंद्र अशी दोन ग्रहणे, दोन उल्का वर्षाव, ग्रहांच्या चंद्र व ताऱ्यांसोबत युती, ग्रहांचे उदयास्त आदींची रेलचेल विद्यार्थी, शिक्षक, आकाशनिरीक्षक, शास्त्रज्ञ आणि खगोलप्रेमींसाठी असेल, अशी रास्त अपेक्षा आहे. पृथ्वीवरून पाच ग्रह, पाऊणेपाच हजार तारे आणि ८८ तारका समूह साध्या डोळ्यांनी सहज पाहू शकतो. सद्यःस्थितीत गुरु, शुक्र आणि शनी हे तीन महाग्रह आकाशात अतिशय विलोभनीय दर्शन देत आहेत. महिन्याच्या प्रारंभी बुध कन्या राशीत व शुक्र सिंह राशीत प्रवेश करेल. ता. ३ ऑक्टोबर रोजी मंगळ ग्रहाचा पश्चिमेस अस्त, ता.६ ऑक्टोबरला



रात्री ७ वा. इंटरनॅशनल स्पेसस्टेशन दर्शन, ता.७ ऑक्टोबरला बुध ग्रहाचा पूर्वेकडे अस्त होत आहे. ता.७, ८ व ९ रोजी रात्री ड्रेक्रोनिड तारका समूहातून आणि ता.२१, २२ रोजी मृग नक्षत्र समुहातून दरताशी वीस एवढ्या उल्का पडताना दिसतील. ता.१४ ऑक्टोबरला कंकणाकृती सूर्य ग्रहण आहे; ता.२८ रोजी मध्यरात्रीनंतर होणारे खंडग्रास चंद्रग्रहण सुमारे सव्वा तास बघता येईल, हे विशेष उल्लेखनीय! भारताच्या राजस्थान, पंजाब, हरियाणा आणि उत्तराखंड या राज्यातील काही भागातून हे ग्रहण कंकणाकृती स्थितीत दिसणार आहे. तर भारताच्या बाकीच्या भागात खंडग्रास स्थितीत ग्रहण पाहायला मिळेल. महाराष्ट्रातून खंडग्रास ग्रहण दिसणार असून साधारण ७० टक्के सूर्य झाकला गेलेला पाहायला मिळेल. ग्रहण पाहण्याची वेळ अशी की, भारतीय वेळेनुसार सकाळी सव्वानऊ वाजण्याच्या सुमारास ग्रहणाची सुरूवात होईल. पण आपण नेमके कुठल्या देशातून आणि कुठल्या शहरातून ग्रहण पाहणार आहोत, त्यानुसार वेळेत थोडाफार फरक पडू शकतो. भारतातून साधारण सकाळी सव्वा दहा ते दुपारी पावणेदोन या वेळेत हे ग्रहण दिसणार आहे. उत्तर भारतात हरयाणाच्या कुरुक्षेत्रात सकाळी १० वाजून २१ मिनिटांनी सूर्यग्रहणाची सुरूवात होईल. दुपारी १२ वाजून १ मिनिट ते १२ वाजून २ मिनिटे अशी साधाराण एक मिनिटापर्यंत ग्रहणाची कंकणाकृती अवस्था पाहता येईल. तर दुपारी १ वाजून ४८ मिनिटांनी सूर्यग्रहण पूर्णपणे सुटलेले असेल. महाराष्ट्रातून खंडग्रास ग्रहण दिसण्याच्या वेळा अशा आहेत- मुंबई - १०.०१ ते १३.२८, पुणे- १०.०३ ते दुपारी १३.०३, नाशिक- १०.४ ते १३.३३, नागपूर- १०.१८ ते १३.५१, औरंगाबाद- १०.०७ ते १३.३७ ग्रहण पाहताना कधीही सूर्याकडे थेट पाहू नका. कारण सूर्याच्या तीव्र किरणांमुळे डोळ्यांवर परिणाम होऊ शकतो. ग्रहण पाहण्यासाठीचे खास फिल्टर लावलेले चष्मे घालूनच ग्रहण पाहावे. पिनहोल कॅमेरा, घरातली चाळणी किंवा सौर दुर्बिणीच्या माध्यमातून सूर्याचं प्रतिबिंब एखाद्या पडद्यावर पाडून ग्रहणाची स्थिती पाहता येते. एरवी अनेक हौशी खगोलप्रेमी ग्रहण पाहण्यासाठी जिथे ते सर्वोत्तम स्थितीत दिसेल, अशा जागी जातात. पण तरीही ग्रहणकाळात कुरुक्षेत्र किंवा अन्य ठिकाणी गर्दी होण्याची शक्यता टाळता येणार नाही, असे वाटते. उत्तर भारतात ग्रहणकालामध्ये तीर्थस्नानाची प्रथा आहे. कुरुक्षेत्र हे आधीच आपल्याकडे महान तीर्थक्षेत्र म्हणून ओळखलं जातं. त्यामुळे ग्रहणकालात तिथल्या ब्रह्मसरोवरात तीर्थस्नानासाठी लोकांची गर्दी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. कोरोनाकाळात या पार्श्वभूमीवर हरयाणा सरकारला विशेष खबरदारी घ्यावी लागली होती, हे विशेष! गैरसमज बाजूला सारून ग्रहणाचा आनंद घ्यावयास हवा. ग्रहणाविषयी आपल्याकडे खूप गैरसमज आणि अंधश्रद्धा आहेत. राहू- केतू हे राक्षस सूर्याला गिळतात, म्हणून सूर्यग्रहण होतं असं पूर्वी लोकांना वाटत होतं. ग्रहणात हवा, पाणी अन्नपदार्थ दूषित होतात, असाही एक मोठा गैरसमज होता. त्यामुळं पूर्वी ग्रहण सुटल्यावर लोक आंघोळ करीत असत, साठवलेले सगळे पाणी ओतून टाकीत व नव्याने पाणी भरत असत. पण अशा प्रथा व गैरसमज फारच चुकीचे आहेत. ग्रहण सुटले म्हणून आंघोळ करण्याची काहीही आवश्यकता नाही. कारण ग्रहणात काहीही अशुद्ध होत नाही. ग्रहणात जेवू नये, ग्रहणात झोपू नये, ग्रहणात मलमूत्र विसर्जन करू नये, असेही सांगितले जाते. मात्र त्यात काहीही तथ्य नाही. शनी दर्शनाचा योगसूर्यमालेतील सर्वात सुंदर आणि वलयांकित ग्रह शनी हा रात्रीच्या प्रारंभी ते पहाटेपर्यंत पूर्वेकडून पश्चिमेकडे दर्शन देत आहे. शनी ग्रह सद्या कुंभ राशी समूहात आहे. त्यानंतर रात्री साडे आठनंतर पूर्व क्षितिजावरच सूर्यमालेतील सर्वात मोठा असलेला गुरू ग्रह हा आपल्याला अगदी ठळकपणे पहाटेपर्यंत पाहता येईल. त्यानंतर पहाटेच्या निवांत वेळी पूर्व क्षितिजावर अधिराज्य गाजवणारा शुक्र ग्रह चांगल्यापैकी बघता येईल. या तिन्ही ग्रहांचे दुर्बिणीतून दर्शन केल्यास शनी ग्रहाचे सुंदर वलय, आणि गुरू ग्रहाचे चार चंद्र चांगल्यापैकी पाहता येतील. पहाटेच्या वेळी शुक्र ग्रहाच्या चंद्रासारख्या कला बघता येतील. असा हा अनोखा अवकाशीचा नजारा प्रत्येकाने आपल्या डोळ्यात साठवूनच घ्यावा.



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# सेवा हमी कायदा धाब्यावरच!!

आधुनिक केसरी

**नागरिकांना वेळेत सुविधा मिळावी, यासाठी राज्य सरकारने 'सेवा हमी कायदा' लागू केला खरा. परंतु, हा कायदा तलाठी कार्यालयासह शिक्षण विभाग व अन्य विभागात कसा धाब्यावर बसविला जातो, याची काही उदाहरणे समोर आली आहेत. अर्ज दाखल करून घ्यायचा; पण पोच द्यायची नाही. 'खूष' केल्याशिवाय नोंद घालायची नाही, असे प्रकार सर्रास सुरू आहेत. राज्यातील कुठल्याही तहसील आणि तलाठी कार्यालयात नागरिकांची सर्रासपणे लूट होत असते.पैसे दिल्याशिवाय कोणतेही काम होत नसल्याचे वास्तवआहे,याचा अनुभव तहसील व जिल्हा कार्यालयात गेलेल्या प्रत्येकांनी घेतलेला आहे.**

नागरिकांची कामे वेळेत मार्गी लागावीत, भ्रष्टाचाराला आळा बसावा, यासाठी राज्य सरकारने 'सेवा हमी कायदा' आणि 'ई-फेरफार'सारख्या योजना सुरू केल्या. परंतु, त्यांचा लाभ नागरिकांना मिळत नसल्याचे समोर आले आहे.दस्तनोंदणीनंतर तलाठी कार्यालयात नोंदी होणे अपेक्षित आहे. परंतु, किमान चार ते पाच महिने हेलपाटे मारल्याशिवाय नोंदी होत नाहीत. नोंदीसाठी अर्ज केल्यानंतर तो स्वीकारला जातो. परंतु, अर्जाची पोच दिली जात नाही. पोच दिली, तर नोंद प्रलंबित ठेवता येत नाही. सेवा हमी कायद्यांतर्गत कारवाई होऊ शकते, हे टाळण्यासाठी त्यातून हा मार्ग काढण्यात आला आहे. ज्याच्याकडून पैसे येतील, त्यांच्या अर्जाची नोंद घातली जाते. अन्यथा, हलपाटे मारण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो.एनए आणि सातबारा उताऱ्यावर नोंदी सेवा हमी कायद्याने दिलेल्या मुदतीतच घेतल्या पाहिजेत. परंतु, अशा प्रकारे नागरिकांची अडवणूक होत आहे. तहसीलमध्येही 'हात ओले'चे अनुभव जमीन मालक आणि बांधकाम व्यावसायिकांना होणारा त्रास टाळण्यासाठी राज्य सरकारने बिगर शेतजमीन (एनए) करण्याची प्रक्रिया सुटसुटीत केली खरी; परंतु हात ओले केल्याशिवाय दाखला न मिळणे, असे अनुभव नागरिकांना येत आहेत. महापालिका अथवा 'पीएमआरडीए'कडे बांधकाम मंजुरीसाठी प्रस्ताव दाखल केल्यानंतर संबंधित संस्थेकडून तो प्रस्ताव संबंधित तहसील कार्यालयात 'एनए'चा दाखला देण्यासाठी पाठविला जातो. तहसीलदाराने संबंधितांना साठ दिवसांच्या आत चलन देणे अपेक्षित आहे. चलन मिळाल्यानंतर ते बॅंकेत भरल्यानंतर तहसीलदार कार्यालयातून दाखला दिला जातो. तो संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेकडे सादर केल्यानंतर बांधकाम प्रस्ताव मंजूर केला जातो.मात्र तहसीलदार कार्यालयात दाखल्यासाठी प्रस्ताव आल्यानंतर त्यावर दोन दोन वर्षे कार्यवाही होत नाही. 'हात ओले' केल्यानंतरच हा दाखला दिला जातो. अनेकदा मंजुरीचे प्रस्तावच गहाळ होतात. 'एनए'चा दाखला मिळाल्याशिवाय बांधकाम प्रस्ताव मंजूर होत नसल्यामुळे अडकून राहावे लागते, अशा तक्रारी रोजच वर्तमान पत्रातून वाचायला मिळतात.



शिक्षण विभागात सेवा हमी कायदा तर धाब्यावर राजरोसपणे बसविला जातो.शिक्षण विभागाअंतर्गत कार्यरत कर्मचारी, विद्यार्थी, पालक, शिक्षक यांची मोठी संख्या लक्षात घेऊन या सेवांचे विस्तारीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे राज्यातील शासनमान्यताप्राप्त सर्व प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, अध्यापक महाविद्यालये यांच्यामार्फत दिल्या जाणाऱ्या १०५ सेवा या कायद्याच्या कक्षेत आणण्यात आल्या आहेत.मात्र इथे देखील अनेक प्रस्ताव. कित्येक महिने पडून राहतात.

सेवा हमी कायद्याअंतर्गत एकूण १०५ सेवांचा समावेश करण्यात आला आहे. त्यात विद्यार्थ्यांशी संबंधित सेवांमध्ये अधिकृत (बोनाफाईड) प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, नाव, जात, जन्मतारीख बदल मान्यता आदेश आदी सेवा एक ते ३० दिवसांमध्ये द्याव्या लागतील. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांशी संबंधित सेवांमध्ये भविष्य निर्वाह निधी अग्रीम, ना परतावा अंतिम प्रदान मंजुरी आदेश, सेवा निवृत्ती प्रकरणे सादर करणे, थकित वेतन देयक सादर करणे, शालार्थ प्रणालीची माहिती अद्ययावत करणे, सेवा निवृत्तीचे लाभ देणे, मूळ सेवा पुस्तक पडताळणी, सेवा खंड क्षमापन आदी सेवा एक ते ४५ दिवसांमध्ये देणे बंधनकारक आहे.मात्र अधिकाऱ्यांचे खिसे गरम केल्याशिवाय कुठलीच फाईल पुढं सरकत नाही.

# खेमावती नदीवरील नवीन पुलाबाबत प्रस्ताव सादर; हणमंतराव शेळकेंनी मानले खासदारांचे आभार


आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** लोणंद ता.खंडाळा येथील खेमावती नदीवरील जीर्ण स्वरूपात असलेल्या छोट्या पूलाची एनएचआय कडून दखल घेण्यात आलेली असून नवीन पूल बांधण्यासाठी ५ कोटी २० लाख रुपये इतक्या खर्चाचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.याबाबतची माहिती खासदार श्रीनिवास पाटील यांनी दिली.या प्रस्तावाबद्दल लोणंद नगरीचे माजी नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते हणमंतराव शेळके पाटील यांनी विशेष समाधान व्यक्त करत समस्त लोणंदकरांच्या वतीने खासदार श्रीनिवास पाटील,एनएचआय व या प्रश्ना संदर्भात सहकार्य लाभलेल्या सर्व संबंधितांचे आभार मानले आहेत.

खेमावती नदीवरील पुलाचा हा प्रश्न हणमंतराव शेळके पाटील सुद्धा सतत मांडत पाठपुरावा करत होते.वारंवार निवेदने देत होते.या प्रश्नाची दखल घेण्यात यावी.म्हणून तळमळीने मागणी करत होते. हणमंतराव शेळके पाटील यांच्याकडून गेल्याच महिन्यात केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना सुद्धा निवेदन देण्यात आले होते.यापूर्वी खासदार श्रीनिवास पाटील,आ.मकरंद पाटील यांना सुद्धा निवेदने देण्यात आली होती.खेमावती नदीच्या पुलाचा विषय पुर्णपणे एनएचआय कडे असल्याने हा प्रश्न सुटताना अडचणी येत होत्या.

परंतु या प्रश्नासंदर्भात पाठपुराव्याची मालिका ही सुरूच होती.हणमंतराव शेळके यांचे वारंवार या प्रश्नांकडे लक्ष होते.तसेच खासदार श्रीनिवास पाटील सुद्धा संबंधित विभागाकडे लक्ष ठेवून होते.अखेर





या पुलासाठी निधी खर्च प्रस्ताव सादर करण्यात आल्याने या कामास लवकरच गती मिळेल असा विश्वास आता लोणंदकरांना वाटू लागला आहे. हणमंतराव शेळके पाटील यांच्या कडून वारंवार करण्यात आलेला हा पाठपुरावा लोणंदकरांच्या व येथून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी सत्कारणी लागलेला आहे.असेच म्हणावे लागत आहे.

या प्रस्तावाबद्दल हणमंतराव शेळके पाटील म्हणाले की,लोणंद येथील खेमावती नदीवरील ब्रिटिश कालीन असणारा जुना पूल हा नवीन बांधण्यासाठी खासदार श्रीनिवास पाटील,आमदार मकरंद पाटील यांच्याकडे सतत मागणी करत आलोय.गेल्या वर्षभरामध्ये त्याला काही प्रमाणात यश देखील आले.त्याच बरोबर मागील महिन्यामध्ये आदरणीय देशाचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना देखील या कामाचे निवेदन दिले होते.मागील आठवड्यात याच कामाच्या पाठपुराव्यासाठी मी आदरणीय खासदार श्रीनिवास पाटील साहेब यांना भेटलो की, एनएचआय ला संपर्क करून व सांगून हे काम कुठपर्यंत आलय,यासाठी खासदार श्रीनिवास पाटील यांनी संबंधित एनएचआय च्या ऑफिस ला फोन करून या कामाची माहिती घेतली.वारजे पुणे या ऑफिस मधून संबंधित ५ कोटी २० लाखाचा प्रस्ताव हा एनएचआयच्या मुंबई वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर केलाय.खासदार साहेबांनी या संबंधित देखील मुंबईचे चीफ जनरल मॅनेजर यांना फोन केला.या कामाबद्दल माहिती विचारली.हा जो प्रस्ताव सादर केलाय,तो लवकरात लवकर मंजूर करण्यासाठी खासदार साहेबांनी विनंती केली.सूचना केल्या.हे काम,हा प्रस्ताव मंजूर होऊन या खेमावती नदीवरील गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेले काम लवकरात लवकर सुरू होईल.ही अपेक्षा हणमंतराव शेळके पाटील यांनी व्यक्त केलेली आहे. तसेच समस्त लोणंदकरांच्या वतीने त्यांनी खासदार श्रीनिवास पाटील यांचे आभार मानले आहेत.

# स्वकर्तृत्वातून राजकरणात अढळ स्थान निर्माण करणारा लढवय्या 'भूमिपुत्र'

## विष्णुपंत भुतेकर यांचे अभूतपूर्व अभिष्टचिंतन

आधुनिक केसरी

**वाशिम :** जगाचा पोशिंदा शेतकरी जगला पाहिजे. सर्व उद्योगाचा पाया फक्त शेतीच आहे. शेती, शेतकरी आणि देश ही त्रिसूत्री संपूर्ण जगासाठी उपयुक्त ठरणारी आहे. असा दृढ विश्वास असणारे विष्णुपंत कडूजी भुतेकर या एका सामान्य शेतकरी कुटुंबातील महारथीने ' भूमिपुत्र शेतकरी संघटनेची ' स्थापना करून अगणित शेतकऱ्यांच्या मनात उपरोक्त त्रिसूत्रीचा विश्वास निर्माण केला आहे. जन्मजात संघटन कौशल्याची ईश्वरी देणगी लाभलेले विष्णुपंत हे केवळ वाशिम किंवा शेजारी असलेल्या जिल्ह्यांचेच नव्हे; तर ' भूमिपुत्र ' च्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेत आहेत. शेतकऱ्यांसाठी प्रचंड आस्था व त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी केव्हाही रस्त्यावर उतरण्याची तयारी, हीच 'भूमिपुत्र संघटनेची ' खरी ताकद असल्याचे त्यांनी यापूर्वी केलेल्या अनेक आंदोलनावरून उजागर केले आहे. कुठल्याही नेत्याच्या किंवा राजकीय पक्षाच्या प्रभावाखाली न येता, केवळ शेतकऱ्यांचेहित जोपासणाऱ्यांच्या हातात हात घालून त्यांनी राजकारणात सुद्धा आपला आगळावेगळा ठसा उमटवला आहे. कुठलाही राजकीय वारसा नसलेल्या एका सामान्य शेतकरी कुटुंबातून येवून या ध्येयवेढ्या यौध्याने, स्वकर्तृत्वातून राजकारणात अढळ स्थान निर्माण केले आहे. एक लढवय्या ' भूमिपुत्र ' म्हणून आज ४ ऑक्टोबर हा त्यांचा वाढदिवस सर्वत्र धुमधडाक्यात साजरा होत आहे. त्यानिमित्ताने विदर्भ / मराठवाड्यातून विष्णुपंत भुतेकर यांच्यावर आज अभूतपूर्व असा अभिष्टचिंतनाचा वर्षाव होत आहे.


वसंत खडसे
9373578429

वाशिम मधील रिसोड तालुक्यात येत असलेल्या देगाव या छोट्याशा गावातून आलेले विष्णुपंत भुतेकर हे प्रचंड ध्येयवादी, अविरत कष्ट करण्याची तयारी व सामान्य माणसाविषयी वाटणारी कणव, आणि आव्हानांना तोंड देण्याची वृत्ती आदी गुणांमुळे अगदी विद्यार्थीदशेतच एक कुशल संघटक म्हणून संपूर्ण वाशिम जिल्ह्यात नावारुपास आलेलं व्यक्तिमत्व आहे. महाविद्यालयात असतांना त्यांनी विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून आपल्या समाजकार्याची मुहूर्तमेढ रोवली होती. त्यानंतरच्या काळात भुतेकर जिल्हा परिषदेवर सुद्धा निवडून गेले होते. आणि त्याच काळात जिल्हा परिषदेमधील एक कर्तव्यतत्पर व आक्रमक विरोधी पक्ष गटनेता म्हणून त्यांनी आपली कारकीर्द गाजवली होती. आणि तिथूनच खऱ्या अर्थाने त्यांनी जनमानसात आपलं वेगळं स्थान निर्माण केलं होतं. संवेदनशील नेता कसा असावा याचा आदर्श वस्तूपाठ विष्णुपंत यांनी जिल्हावाशीयांना घालून दिला आहे. शेतकऱ्यांवर येणारी अनेक नैसर्गिक संकट,



यामध्ये प्रमुख्याने अतिवृष्टी, अल्पवृष्टी, गारपीट तर कधी सोसाट्याचा वारा. यातून शेतकऱ्यांचे होणारे अतोनात नुकसान व शासनाकडून मिळणारी तुटपुंजी नुकसान भरपाई. ही बाब त्यांच्या संवेदनशील मनाला कायम बोचत होती. यातूनच त्यांना आपणही, शेतकऱ्यांसाठी त्यांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी काहीतरी करायला पाहिजे..! अशी संकल्पना सुचली. आणि पाहता, पाहता ' भूमिपुत्र शेतकरी संघटना ' उदयास आली. आज हिच संघटना विदर्भातील जिल्ह्यासह, मराठवाड्यातील हिंगोली वगैरे जिल्ह्यातून संपूर्ण महाराष्ट्रात घोडदौड करीत आहे. आपल्या वाढदिवसाच्या माध्यमातून, मायबाप शेतकऱ्यांना काहीतरी मिळावे.

या उद्देशाने आज रिसोड येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये हळद परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. जेणेकरून शेतकऱ्यांनी पारंपारिक पिकांना छेद देऊन हमी व नगद पीक असलेल्या बागायती पिकांची कास धरली पाहिजे. वाशिम, बुलढाणा, हिंगोली आदी जिल्ह्यात हळद पीक लागवडीसाठी योग्य जमीन असल्यामुळे, यापिकाविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन व्हावे, या हेतूने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संघटनेच्या सूत्रांनी दिली आहे. तद्वतच, एक सामाजिक जिव्हाळा म्हणून व वारकरी आणि शेतकरी या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून, त्यांचे आराध्य दैवत पंढरपूरचा ' विठ्ठल ' आहे. त्याअनुषंगाने सायंकाळी ७:३० वाजता रिसोड बाजार समितीच्या भव्यप्रांगनात महाराष्ट्रातील नामवंत, महिला कीर्तनकार रूपालीताई सवणे यांचा हरी किर्तन सोहळा पार पडणार आहे. अशा या आगळ्यावेगळ्या ' भूमिपुत्र ' च्या अभिष्टचिंतन सोहळ्यास दैनिक आधुनिक केसरी कडून सुद्धा हार्दिक, हार्दिक शुभेच्छा..!



# टिळक मैदान परिसरात भीषण आग

आधुनिक केसरी न्यूज

**खामगाव :** बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव येथील टिळक मैदान परिसरात भीषण आग लागून दोन दुकाने भस्मसात झाल्याची घटना आज 4 ऑक्टोबर रोजी दुपारी 12 वाजताच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव शहरातील टिळक मैदान भागात असलेल्या एका ठोक कटलरी साहित्याच्या दुकानातील एसीचा जोरदार आवाज होऊन स्फोट झाला.

त्यानंतर लागलेल्या आगीत कटलरी दुकानातील लक्षावधी रूपयांचे साहित्य खाक झाले. या आगीची झळ बाजूच्या मेडीकल दुकानालाही बसली. पाहता पाहता मेडीकलच्या दुकानातील औषधी आणि इतर साहित्याने पेट घेतला. या घटनेची माहिती मिळताच, खामगाव येथील अग्नीशमन दलासह, नांदुरा आणि शेगाव येथील अग्नीशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. यामध्ये खामगाव येथील 3 गाड्यांसह, नांदुरा आणि शेगाव येथील प्रत्येकी एका गाडीचा समावेश आहे. दुपारी 12:40 वाजता ही आग आटोक्यात आली. अग्नीशमन दलासोबतच स्थानिकांनीही आग विझविण्यासाठी मदत केली. दुकाना मागे असलेल्या गोदामातील कटलरी साहित्यही या आगीत भस्मसात झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

# विकासात्मक दृष्टिकोन असलेल्या बळीराजा पँनलच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा : लोकमनवार

आधुनिक केसरी न्यूज

**अशोक हाके**

**कुंडलवाडी :** दि.७ आँक्टोबर रोजी होणाऱ्या बाजार समिती निवडणुकीत एक विकासात्मक दृष्टिकोन ठेवून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या बळीराजा विकास पँनलच्या सर्व उमेदवारांना मतदारांकडून भरभरून प्रतिसाद मिळत आहे. यातील व्यापारी मतदारसंघातुन निवडणुकीच्या रिंगणात असलेले भागवत मनोहर लोकमनवार असून गावागावात मतदारांच्या घेत असलेल्या भेटी दरम्यान बळी राजा पँनलचा विजय झाल्यास तात्काळ मार्केट कमिटीच्या नियोजित जागेत नजरेत भरेल अशी टोलेगंज्ज इमारत उभारण्यात येऊन त्याच ठिकाणी शेतकऱ्यांच्या सुविधासह व्यापारी बंधूसाठी हक्काचे



गाळे उभारून जिल्ह्यातील एक आगळी वेगळी बाजार समिती म्हणून ओळख निर्माण करण्याचा या निमित्ताने संकल्प करण्यात आला.यावेळी या निर्णयाच अनेकांनी कौतुक करून पाठिंबा दर्शविला आहे. ही परिस्थिती पाहता प्रतिस्पर्धी उमेदवारांच्या पायाखालची वाळू घसरत असून आता सर्वांनी पँनलचे प्रमुख तथा जि.प.चे माजी सदस्य लक्ष्मणराव ठक्करवाड यांच्या पाठीशी खंबिरपणे उभे राहून साथ द्यावी असे आवाहन व्यापारी मतदार संघातील उमेदवार भागवत लोकमनवार यांनी केले आहेत.

# साडू, सासू, पत्नीच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** गव्हाली येथे २९ वर्षीय तरुणाने ३ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी घरासमोर विषारी औषध प्राशन करून आत्महात्या केली. या तरुणांनी डाव्या हातावर पेनाने "माझी बायको मला . . "असे लिहीत चिठ्ठी लिहून ठेवली असून त्यात साडू - सासू व पत्नी यांच्या त्रासाला कंटाळून आत्महात्या केली असल्याचे सांगितले.



गव्हाली येथील भाऊसाहेब पांडूरंग शिंदे याने ३ ऑक्टोबर २०२३ रोजी संध्याकाळी विषारी औषध प्राशन करून आत्महात्या केली. त्याने चिठ्ठी लिहून ठेवली आहे त्यात त्याने लिहीले आहे की मी भाऊसाहेब शिंदे मरनार आहे तरी मरनास कारण माझी पत्नी आणि माझी सासु आणि माझा साडु यांचे नाव सोनाली शिंदे शिंदुबाई विष्णु बोराडे रा. उडणगाव आणि माझा साडु आजिनाथ पंडीत रा. खुल्लोड) हा माझ्या आयुष्यात वर्षापासून माझ्या बायकोला फोन करतो. माझ्या पत्नीला जाळ्यात फसवतो मी आणि माझ्या जवळ खुप पैसा आहे मी तुला फिरायला नेईल तुला जे पाहीजे ते देईल असे ही सांगतो. माझ्या सासुनेही तीला सोनालीला विकण्याचा प्रयत्न केला . मी माझ्या सासुच्या फोनवर फोन केला पण ती फोन उचलत नाही माझ्या फोनवर फोन करू नको असे मला म्हणाली माझ्या पत्नी सोबत ही बोलु देत नाही. असा मजकुर लिहून ठेवत हातावर माझी बायको मला ... असे पेनाने लिहून ठेवले आहे. भाऊसाहेब याने चिठ्ठी व हातावर लिहून आत्महात्या केली असल्याचे उघड झाले आहे. एम एल सी वरून स पो नि विलास मोरे यांच्या मार्गदर्शना खाली अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली.

# एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ बल्लारपूर येथे तीन दिवसीय 'मधुमक्षिका पालन' प्रशिक्षणाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ मुंबईचे महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल, बल्लारपूर जिल्हा चंद्रपूर आणि खादी व ग्रामोद्योग आयोग, विभागीय कार्यालय नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आणि कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांच्या मार्गदर्शनात दिनांक 03 ऑक्टोबर 2023 रोजी तीन दिवसीय 'मधुमक्षिका पालन प्रशिक्षण' शिबिराचे उद्‌घाटन महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल, बल्लारपूर येथे पार पडले. ग्रामीण महिला आर्थिक आणि व्यावसायिक दृष्ट्या कसे स्वावलंबी बनतील यासाठी एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ नेहमी अग्रेसर असते. विद्यार्थिनींच्या वेगवेगळ्या कलागुणांना वाव मिळावा सोबतच कौशल्यावर आधारित शिक्षण मिळावे आणि उद्योग क्षेत्रात महिलांचा वाटा कसा वाढवता येईल हा यामागचा उद्देश आहे, यामुळे ग्रामीण महिलांचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण होणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि महर्षी कर्वे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि उद्‌घाटक म्हणून आवाराचे संचालक डॉ. राजेश इंगोले यांची उपस्थिती होती. सोबतच प्रमुख पाहुणे म्हणून खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचे जिल्हा समन्वयक विजय ठाकरे, मुख्य प्रशिक्षक प्रशांत सावंत आणि अनिता कासार यावेळी सहायक कुलसचिव डॉ. बाळू दत्तात्रय राठोड आणि समन्वयक वेदानंद अलमस्त उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजय ठाकरे यांनी केले यावेळी मधुमक्षिका पालन मुळे होणारे लाभ आणि खादी ग्रामोद्योग आयोगाच्या विविध योजनांची माहिती त्यांनी सर्वांना दिली. कार्यक्रमाचे अध्यक्षीय मनोगत डॉ. राजेश इंगोले यांनी व्यक्त केले.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# १५ व्या शब्दगंध साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. भापकर

आधुनिक केसरी न्यूज



**अहमदनगर :** डॉ. पुरुषोत्तम निवृत्ती भापकर यांना आपण सर्वजण एक कर्तव्यदक्ष सनदी अधिकारी म्हणून ओळखतो. त्याचबरोबर एक अभ्यासू वक्ता, एक संवेदनशील मनाचा कवी, व्यासंगी लेखक, चित्रपट गीतकार, त्याचबरोबर कला, साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रामध्येही त्यांचे मोठे योगदान आहे. डॉ. पुरुषोत्तम भापकर यांचे चांदण उन्हातलं, आकांत शांतीचा हे दोन काव्यसंग्रह तसेच भाऊ दीदी, शैक्षणिक षटकार, माझा शालेय परिपाठ, पुरुषार्थाला साथ चौथ्या स्तंभाची, हे शक्य आहे, गुणवत्तेचे शिलेदार, शासकीय योजनांचा खजिना, शोध मुलांच्या मनाचा, अग्रेसर मराठवाडा, युवकांनो स्वावलंबी व्हा, स्वच्छतेचा वारकरी अशी अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्याचबरोबर त्यांच्यावर लिहिलेले प्रशासनातील पुरुषोत्तम हे पुस्तक देखील लोकप्रिय ठरले आहे. गव्हर्नन्स, इंडिया अन बाउंड अशा नियतकालिकांनीही त्यांच्या प्रशासकीय कार्याची दखल घेतली आहे. त्यांच्या या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची दखल घेऊनच शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने पंधराव्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड केली आहे. डॉ. भापकर यांनी प्रत्येक ठिकाणी आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटवला. आणि महाराष्ट्रात एक लोकप्रिय अधिकारी ठरले. विविध ठिकाणी विविध पदावर नोकऱ्या करीत असतानाच त्यांनी अनेक कविता, गाणी, विविध विषयांवरील लेख लिहिले. हजारो व्याख्याने दिली. त्यांची अनेक पुस्तके प्रकाशित झाली. त्यांच्या या कामगिरीबद्दल त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. त्यामध्ये राष्ट्रपती सिल्व्हर मेडल, सर्वोत्कृष्ट अतिरिक्त जिल्हाधिकारी पुरस्कार, भारत ज्योती अवार्ड राष्ट्रीय पुरस्कार, विर एकलव्य राष्ट्रीय पुरस्कार, सर्व्हिस अबोव सेल्फ पुरस्कार, राज्यस्तरीय प्रशासन रत्न पुरस्कार, डॉ. मणीभाई देसाई राष्ट्र सेवा पुरस्कार, महात्मा गांधी शांतता पुरस्कार, राज्यस्तरीय जाणीव पुरस्कार अहमदनगर, राज्यस्तरीय मल्हार रत्न पुरस्कार, वसंतराव नाईक जल संधारण पुरस्कार, उत्कृष्ठ प्रकल्प पुरस्कार, विकास भूषण पुरस्कार, युगंधर पुरस्कार, अमृतवेल गव्हर्नन्स पुरस्कार, हे शक्य आहे या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा कर्मवीर भाऊराव पाटील वाडमय पुरस्कार, महाराष्ट्र चित्रपट महासंघ आणि साई सागर एंटरटेनमेंट नवी मुंबईचा उत्तम प्रशासक, उत्तम साहित्यिक, कला, संस्कृती, लेखन, गीतकार, सिनेमा प्रवर्तक, सामाजिक सुधारणावादी सर्वधर्म समभावाचे पुरस्कर्ते म्हणून महाराष्ट्र भूषण पुरस्कार, आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचा जीवन गौरव पुरस्कार, आदित्य प्रकाशन औरंगाबादचा आदित्य गौरव पुरस्कार, आदर्श प्रतिष्ठान औरंगाबाद चा विशेष साई गणेश पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषद सोलापूर चा मनोरमा साहित्य पुरस्कार, शैक्षणिक षटकार या पुस्तकासाठी कर्मवीर भाऊराव पाटील प्रौढ शिक्षण वांडमय पुरस्कार तसेच स्वच्छतेचा वारकरी समाज भूषण पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. त्यांनी २००९ ते २०१३ या ५ वर्षांच्या कालावधी मध्ये औरंगाबाद महानगरपालिकेचे आयुक्त म्हणून केलेल्या विशेष कामगिरीबद्दल क्रांती चौक ते रेल्वे स्टेशन रस्त्याला डॉ. पुरुषोत्तम भापकर असे नाव देण्यात आले असून औरंगाबाद शहरातील अतिक्रमण हटाव मोहीम राबवून शहराचा श्वास मोकळा केल्याबद्दल त्यांच्या या अतुलनीय कामगिरीवर आधारित पुरुषोत्तम या नावाचा मराठी चित्रपट २०१९ मध्ये संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित झाला आहे. त्याच बरोबर त्यांच्या कथेवर आधारित पाणी बाणी हा दुसरा चित्रपट देखील प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटास इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल पुरस्कार प्राप्त झाला आहे.

शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने दिनांक ७ व ८ ऑक्टोबर रोजी अहमदनगरच्या गंगाधर शास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालयांच्या प्रांगणात होणाऱ्या १५ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद ते भूषविणार आहेत.



# उपजिल्हाधिकारी कार्यालयात सफाई कामगार महिलांचा सन्मान व सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** "स्वच्छता हीच सेवा" या अंतर्गत या स्वच्छता मध्ये महत्वाची भूमिका पार पाडणाऱ्या पालिकेच्या सफाई विभागातील महिलांचा उपजिल्हाधिकारी डॉ. अरूण जऱ्हाड यांच्या कार्यालयात नुकताच सन्मान व सत्कार करण्यात आला. या प्रसंगी श्रीमती व्ही.एस. वाघ यांनी सफाई कामगार महिलांना शाल व गुलाब पुष्प देऊन त्यांचा यथोचित सत्कार केला तर उपजिल्हाधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड, स्वच्छतादूत धोंडीरामसिंह राजपूत, दशरथ बनकर ,स्वप्नील जेजुरकर, काशिनाथ शेठ गायकवाड, जितेंद्र चापानेरकर यांनी पुरुष सफाई कामगारांचा शाल व पुष्प देऊन सत्कार केला.

# सावित्रीबाई फुले विद्यालयाचा महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग



आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयातील खेळाडू सतिष सुनील क्षिरसागर व तृप्ती हिरालाल घोंगडे यांनी डेरवण, जि. रत्नागिरी येथे नुकत्याच संपन्न झालेल्या राज्यस्तरीय ज्युनियर ॲथलेटिक्स स्पर्धेत १७ वर्षे आतील वयोगटात २००० मीटर धावणे व १०० मीटर धावणे या स्पर्धेत उत्स्फुर्त सहभाग नोंदविला. शाळेच्या इतिहासात प्रथमच शाळेने राज्यस्तरावर सहभाग नोंदविला. त्याबद्दल विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती वैशाली घोंगडे यांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. खेळाडूंनी घेतलेल्या मेहनत क्रीडा शिक्षक हरीभाऊ राऊत यांचे मार्गदर्शन सुनिल पवार यांचे सहकार्यामूळे प्रथमच शाळेने राज्यस्तरावरील स्पर्धेत सहभाग नोंदविला.

या यशाबद्दल जळगाव जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव राजेश जाधव, महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बाबूराव आण्णा घोंगडे यांच्या सह सर्व संचालक मंडळ, जामनेर तालुका ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव गिरीष पाटील, श्रीमती कल्पना बनकर, श्रीमती माधूरी बारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# आजी-माजी सैनिकांसाठी जिल्ह्यात पतसंस्था सुरू करणार

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** माजी सैनिकांची बिना परिश्रम यश कहा या सैनिकी संघटनेचा वर्धापनदिन रविवार दि.१ ऑक्टोबर २०२३ रोजी चिखली येथील राजवाडा रिसॉर्ट मेहकर फाटा चिखली येथे उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून सुभेदार मेजर सुरेश तेलंग,उद्घाटक मेजर यादव म्हस्के, कॅप्टन वालचंद परमेशोर, कॅ.रामदास लहाने, रमेश अवसरमोल, भिमराव वानखेडे, गुलाब पानझडे, अशोक पवार, विजय जाधव, ज्ञानेश्वर ठेंग, केशव सोनुने, नंदु ढाकरके, गौतम सावळे, संजय खंडारे, शेषराव चव्हान, काशिनाथ इंगळे, दत्ता गवई, सतिश पवार आदी उपस्थीत होते.

या वेळी इतिहास अभ्यासक राजेश साळवे म्हणाले की 'महार रेजिमेंट' देशातली अशी एकमेव रेजिमेंट आहे, ज्यामध्ये देशातल्या सगळ्या भागातल्या वेगवेगळ्या समुदायातील सैनिकांचा समावेश आहे. रेजिमेंटचा इतिहास स्वातंत्र्यपूर्व काळापासूनचा आहे, परंतु भारतीय सेनेमध्ये या रेजिमेंटचा समावेश १ ऑक्टोबर १९४१ रोजी करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरक्षा सल्लागार समितीचे सदस्य झाल्यानंतर या रेजिमेंटच्या भारतीय सैन्यातील समावेशासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले.

सतिश पवार म्हणाले की महार रेजिमेंट चा जाज्वल्य गौरवशाली इतिहास आहे. अनेक या रेजिमेंटने अनेक युद्धांमध्ये हिरीरीने सहभाग नोंदविला व अनेक विक्रम घडविले,परंतु सैनिक देशसेवा करून सेवानिवृत्त होऊन आल्यानंतर समाज मात्र त्यांना सामाजिक, राजकिय प्रवाहात पाहिजे तेव्हढ्या प्रमाणत सामील करुन घेत नाही ही मोठी शोकांतिका आहे.म्हणुन मेजर लक्ष्मण साळवे हे संघटनेच्या माध्यमातून सैनिकांच्या अडी अडचणी सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत आहेत,त्यांच्या प्रत्येक कार्यात आम्ही होईल ती मदत करु अशी ग्वाही दिली. तर मेजर लक्ष्मण साळवे यांनी आणि माजी सैनिकांची पाहिली पतसंस्था लवकरच सुरु करणार असल्याची घोषणा केली.कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण करुण, चिखली तालुकयातील शहीद स्मारकपर्यंत अभिवादन रॅली काढण्यात आली.

१९६२, १९६५, १९७१, १९९९ च्या युद्धात ज्यांनी ज्यांनी सहभाग नोंदविला असे विर जवान, शहीद वीर पत्नी, वीर माता यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मेजर लक्ष्मण साळवे यांनी केले, आभार प्रदर्शन मेजर रमेश साळवे यांनी केले, यशस्वीतेसाठी राजु वानखेडे, गणेश जाधव, प्रकाश मिसळकर, पंडित जाधव, राहुल जाधव, जय शिरसाठ सुनिल साबळे, रमेश ओव्हाळे, अर्जून साबळे, सीताराम मोरे, अशोक बोरकर, विठ्ठल गवई आदींनी परिश्रम घेतले.

# दिव्यांग मंत्रालय विभाग केवळ नावापुरतेच: बच्चू कडू

आधुनिक केसरी न्यूज

**वाशिम :** सरकारने मला दिव्यांग मंत्रालय खाते दिले. मात्र, हे खाते केवळ नावापुरतेच शिल्लक आहे. ना कुठली गाडी, ना घोडी, ना कोणतेही अधिकार. मात्र समाधान याचे आहे. की मी तुमच्यापर्यंत पोहोचू शकतो. तुमच्या अडचणी समजून घेऊन येणाऱ्या काळात दिव्यांगाचे दुःख कमी करून तुमच्यासाठी लढत राहील, असे प्रतिपादन दिव्यांग कल्याण विभाग राज्यमंत्री तथा आमदार बच्चू कडू यांनी केले. दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगाच्या दारी या उपक्रमाअंतर्गत आज ४ ऑक्टोबर रोजी तिरुपती लॉन येथे दिव्यांग मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने दिव्यांग नागरिकांची उपस्थिती होती. पुढे बोलताना बच्चू कडू म्हणाले की, दिव्यांगासाठी पाच टक्के निधी खर्च होणे गरजेचे आहे. मात्र, त्याकडे दुर्लक्ष केले जाते.

# घाणेगाव तांडा येथे विविध उपक्रमांनी वन्यजीव सप्ताह साजरा

## वनपरिक्षेत्र अधिकारी नीलेश सोनवणे यांनी दिली वन्यजीवांची प्रबोधनात्मक माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील घाणेगाव तांडा येथे वनपरिक्षेत्राधिकारी कार्यालय अजिंठा/सावळदबारा अंतर्गत येणाऱ्या घाणेगाव तांडा निलेश सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली शिलेदार अविनाश राठोड यांनी आश्रम शाळेत १ ते ७ ऑक्टोबरपर्यंत वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. गावकऱ्यांना वनाबद्दल आकर्षण निर्माण होऊन वनसंपतीचे तसेच वन्यजीवांचे संरक्षण व्हावे, प्रत्येक मानवाला वनसंपत्तीविषयी आपुलकी असावी या हेतूने सप्ताहभर विविध उपक्रम राबविण्यात आले. विद्यार्थ्यांचे वृक्ष प्रेम जागृत होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या सहभागाने काढण्यात आलेल्या वन रॅलीच्या माध्यमातून गावागावातील लोकांना वन्यजीवाबद्दल जागृत करण्यात आली. वनपरिक्षेत्र अधिकारी निलेश सोनवणे व अविनाश राठोड यांच्या पुढाकाराने वन्यजीव सप्ताहाप्रसंगी कार्यक्रमाचे आयोजन आश्रम शाळेत करण्यात आले. शालेय विद्यार्थी व वनसमिती पदाधिकाऱ्यांसह वन्यजीव सप्ताहाप्रित्यर्थ गावातून रॅली काढून गावकऱ्यांना वनाबद्दल माहिती देऊन जागृत करण्यात आली. वन्यजीव सप्ताहाच्या वृक्ष लागवड करण्यात आलेल्या रक्षण करणे.

शालेय विद्यार्थ्यांना वन्यजीव व निसर्ग संपत्तीचे अविनाश राठोड यांनी मार्गदर्शन करुन वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. यावेळी आश्रम शाळेत वनपरिक्षेत्र अधिकारी नीलेश सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला यावेळी शाळेचे मुख्याध्यापक तसेच वन परिमंडळ अधिकारी अविनाश राठोड, वनरक्षक सुनील खर्डे, चाथे, राठोड, ननावरे, वाघ तसेच वनमजूर महाकाळ, गुप्ता,सय्यद पाशू व शाळेतील पहिली ते दहावी पर्यंतचे विद्यार्थी तसेच गावकरी उपस्थित होते उपस्थित विद्यार्थ्यांना यावेळी वन्यजीव बाबत आपले जीवनात त्यांचे महत्त्व तसेच वन्यजीव शिकारी रोखणे ,मानव व वन्य प्राणी संघर्ष रोकने बाबत विद्यार्थ्यांना सखोल अशे वन परिमंडळ अधिकारी अविनाश राठोड यांनी मार्गदर्शन केले.



# पिरबावडा सेवा सहकारी सोसायटीच्या आर्थिक व्यवहारात अनियमितता

## गटसचिव व चेअरमन यांच्या गैरकारभाराच्या चौकशीची मागणी

आधुनिक केसरी न्यूज




**फुलंब्री :** विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी या शेतकऱ्यांच्या हिताचे कार्य करणाऱ्या या शेतकऱ्यांच्या या संस्थेत शेतकऱ्यांनी व्याजापोटी भरणा करूनही थकबाकी यादीत नाव आल्याने हजारोचा गैरव्यवहार झाल्याचा प्रकार पिरबावडा तालुका फुलंब्री येथील सेवा सोसायटीत उघड झाला असून सदर सोसायटीचे गटसचिव व संस्थेचे चेअरमन यांची तत्काळ चौकशी करून कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. पिरबावडा तालुका फुलंब्री येथील शेतकरी शिवराम सर्जेराव गाडेकर, किशोर एकनाथ गाडेकर, विष्णु विनायकराव मुळे, सदाशिव लिंबाजी पटोले, गंगाधर गोपीनाथ बोकिल, मंदाबाई कौतिक गाडेकर, कचरू एकनाथ बोकिल, रुखसना बेगम जाफर अली, राजू कौतिक गाडेकर, संजय कौतिक गाडेकर , या शेतकऱ्यांनी सहाय्यक निबंधक साहेब, सहाय्यक निबंधक सह संस्था फुलंब्री, ता. फुलंबी जि.छ. संभाजीनगर (औरंगाबाद) यांना २५ सप्टेंबर रोजी दिलेल्या तक्रारीत म्हंटले आहे की पिरबावडा, ता. फुलंब्री येथील विविध कार्यकारी सोसायटीचे आम्ही पिक कर्ज धारक सभासद असून आम्ही नियमित कर्ज फेड केली परंतु आमचे नाव पुन्हा थकबाकी यादीत आले. आम्ही २०२२ ते २०२३ पूर्ण व्याज पूर्णपणे सेवा संस्थेचे गट सचिव एस जि सोमदे व संस्थेचे अध्यक्ष देविदास काळे यांच्याकडे भरणा केला. परंतु त्यानी ते व्याजापोटी जमा झालेले शेतकऱ्यांचे जमा रुपये बँकेत भरणा न करता परस्पर दोघानी वाटुन घेतले व आम्हा शेतकऱ्यांना थकबाकित ठेवले. सदर रक्कम आम्ही ८ मार्च २०२३ रोजी सदर व्यक्तीकडे सपुर्द केलेली आहे परंतु सहा महीने उलटून गेले तरी गट सचिव सोमदे चेअरमन काळे यांनी त्या रकमेचा बँकेत भरना केला नाही व यावरुण असे दिसून आले की गट सचिव सोमदे व श्री चेअरमन काळे यांनी भरना ना केल्यामुले आमची प्रतिष्ठा व थक्यकिदार म्हणून राहण्याची नामुष्की आमच्यावर आली.

तसेच यापूर्वी दि. २३/८/२०२३ रोजी संस्थेचे उपाध्यक्ष पंढरीनाथ हनुमंता गाडेकर व इतर आठ सदस्य यांनी आपल्या कार्यालयात त्यांच्या बद्दल लेखी तक्रारसुद्धा केली होती. मात्र चौकशी झाली नाही. उपलेखा परीक्षक सहकारी संस्था ता खुलताबाद पि. पि. गायकवाड यांच्याकड़े चौकशीचे आदेश सुद्धा दिल्याचे समजते परंतु चौकशी झाली नाही. याबाबत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था फुलंब्री याचे कार्यालय, डी.डी.आर. कार्यालय छ. संभाजीनगर (औरंगाबाद) यांना तक्रारी दिल्या आहे. संबंधितांवर चौकशी अंती निलंबन करून फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात यावे. अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन केले जाईल असे कळविले आहे.

# अविनाश घोगरे यांना निर्वाण फाउंडेशनचा 'राज्यस्तरीय सवित्रीज्योती सन्मान पत्रकार पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**घनसावंगी :** निर्वाण फाउंडेशन नाशिक यांच्या कडून दरवर्षी दिला जाणारा राज्यस्तरीय सवित्रीज्योती सन्मान पत्रकार पुरस्कार २०२३ या वर्षीचा पत्रकार अविनाश घोगरे यांना दि ३ऑक्टोंबर रोजी पत्राद्वारे पुरस्काराची घोषना करण्यात आली निर्वाण फाउंडेशन नाशिकच्या वतीने पत्रकारिता क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्या संपादक, पत्रकार, वार्ताहर यांच्या कार्याचा विचार करून, त्यांच्या सामाजिक बांधिलकीचा सर्वांगीण विचार करून, त्यांच्या कृतुत्वाचा सन्मान म्हणून, त्यांच्या कार्याचे उचित मूल्यमापन व्हावे यासाठी पत्रकारिता क्षेत्रातील राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतो पत्रकारिता क्षेत्रात अती उल्लेखनीय कार्य करणाऱ्या, सामाजिक प्रश्न वृत्तपत्राच्या माध्यमातून हिरारीने मांडणाऱ्या, आपल्या लेखणी च्या माध्यामातुन प्रशासनाचे लक्ष वेधून घेणाऱ्या व समाजहित जोपासणाऱ्या व्यक्तीस राज्यस्तरीय सावित्रीज्योती सन्मान पुरस्कार घोषित करण्यात येतो. ह्या वर्षीचा निर्वाण फाउंडेशनचा राज्यस्तरीय सावित्रीज्योती सन्मान पुरस्कार २०२३ पुरस्कार विजयाचे मानकरी घनसावंगी तालुक्यातील भूमिपुत्र पत्रकार अविनाश घोगरे हे ठरले आहेत. पत्रकार अविनाश घोगरे हे जालना जिल्ह्यातील घनसावंगी तालुक्यात अनेक वर्षांपासून निर्भीड, निःपक्ष पत्रकारिता करीत आहेत, आपल्या पत्रकारितेतुन त्यांनी आजवर अनेकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. सामाजिक उपक्रमामध्ये त्यांचा विशेष सहभाग असतो व जनसामान्यांच्या विकासासाठी, न्यायासाठी आहोरात्र प्रयत्न करत असतात त्यामुळेच एकंदरीत त्यांच्या कार्याचा गुण गौरव म्हणूनच ते ह्या राज्यस्तरीय पत्रकार पुरस्कारा साठी पात्र ठरले आहेत. त्यामुळे घनसावंगी तालुक्यातील सर्व पत्रकार,घनसावंगी शहरातील लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक यांनी त्यांचे अभिनंदन केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

# बाजार सावंगी येथे ग्राम स्वच्छता मोहीम

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे रविवारी (ताः१) ऑक्टोबरला ग्रामपंचायतच्या वतीने ग्राम स्वच्छता मोहीम यशस्वीरित्या राबविण्यात आली.

बाजारपेठेत स्वच्छते ची सुरुवात होऊन विविध ठिकाणी साफसफाई करण्यात आली. स्वच्छतेच्या जयघोषात जनजागृती केली. यावेळी सरपंच आप्पाराव नलावडे पुंजाजी नलावडे वसंत नलावडे मुख्याध्यापक हरिभाऊ दहिफळे ग्रामसेवक बनसोड ग्रामपंचायत सदस्य कल्याण शिवाजी काटकर पोपट काटकर आशा कार्यकर्त्या महिला बचत गटाच्या सदस्य कर्मचारी शुभम चव्हाण गणेश नलावडे बबन नलावडे दगू सोनवणे यांच्यासह ग्रामस्थांचा मोठा सहभाग होता. ओला व सुका कचरा एकत्रित करून ट्रॅक्टर मध्ये भरून कचरा डेपोत नेण्यात येऊन विल्हेवाट लावण्यात आली.



# जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूल आवरे येथे गांधी जयंती उत्साहात साजरी



आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** आत्माराम ठाकूर मिशन संचालित जानकीबाई जनार्दन ठाकूर स्कूल, आवरे या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत महात्मा गांधी व लालबहाद्दूर शास्त्री यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली . पिरकोन गावचे समाजसेवक विलास गावंड यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन झाले. तसेच महात्मा गांधी व लालबहाद्दूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अशोक ठाकूर, शिक्षक-पालक संघटनेच्या सदस्या प्रणाली पाटील व मुख्याध्यापिका निकिता म्हात्रे उपस्थित होते. इंग्लंडचे पंतप्रधान विस्टन चर्चिल हे भारतातील दोनच व्यक्तीमत्त्वाना घाबरत होते ते म्हणजे महात्मा गांधी व सरदार वल्लभाई पटेल. कारण या दोघांमध्ये नितीमत्ता होती.

आए.ए.एस. अधिकारी जेव्हा भारतात येत तेव्हा विस्टन चर्चिल यांना म्हणत की गांधी व पटेल यांच्या समोर काही बोलू नका कारण हे दोन्ही व्यक्तीमत्त्व पहिले सही करून घेत व नंतर मजकूर लिहित. प्रत्येक विद्यार्थ्याने महात्मा गांधीजींचे माझे सत्याचे प्रयोग व साने गुरुजींनी लिहिलेले श्यामची आई ही दोन पुस्तके वाचली पाहिजे व प्रत्येकाच्या संग्रही असावी असे मत संस्थेचे अध्यक्ष अशोक ठाकूर यांनी व्यक्त केले.

महात्मा गांधीजींच्या जीवनावर समर म्हात्रे, आरोही म्हात्रे, स्वरा पाटील, ध्वेन म्हात्रे, मौर्य गावंड, कौस्तुभ म्हात्रे, आस्था गावंड व श्रेया गावंड यांनी भाषणे केली. यावेळी विद्यालयाचे सर्व विद्यार्थी शिक्षक व पालक यांनी आवरे गावात पदयात्रा काढली.या पदयात्रेत ४५ विद्यार्थ्यांनी गांधीजीची वेशभूषा केली. इ. ६ वी च्या विद्यार्थ्यांनी स्वच्छतेवर पथनाटय सादर केले. या पथनाट्यात विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा संदेश दिला. कार्यक्रमाचे निवेदन प्राजक्ता नाईक यांनी केले.

# लोहगड नांद्रा येथे स्वच्छता अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील लोहगड नांद्रा येथील लोहगडावर स्वच्छता पंधरवाडा - स्वच्छता ही सेवा अभियानांतर्गत आयटीआय कॉलेज फुलंब्रीच्या विद्यार्थी / विद्यार्थिनी यांच्या समवेत स्वच्छता अभियानाचा शुभारंभ करून स्वच्छता अभियानात सहभाग घेतला.

राष्ट्रपिता महात्मा गांधीह्यांच्या जयंतीच्या अनुषंगाने पंतप्रधान मोदी ह्यानी संपूर्ण भारतीयाना स्वच्छ भारत अभियानात सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी माजी विधानसभा अध्यक्ष तथा आमदार हरीभाऊ बागडे नाना भाजपा जिल्हाध्यक्ष सुहास भाऊ शिरसाठ, भाजपा जिल्हा सरचिटणीस सौ. ऐश्वर्याताई अभिषेक पा. गाडेकर, तालुकाध्यक्ष श्री. सांडू आण्णा जाधव, विलास उबाळे, कृष्णा सोटम तसेच सरपंच, उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक यांच्यासह पदाधिकारी - कार्यकर्ते तसेच विद्यार्थी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# वडवाळीसह चार ग्रामपंचायतचा बिगुल वाजला

आधुनिक केसरी न्यूज



**पैठण :** माहे जानेवारी २०२३ ते डिसेंबर २०२३ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायती, नव्याने स्थापित व सन २०२२ मध्ये निवडणूका न होऊ शकलेल्या ग्रामपंचायतींच्या ( सदस्य पदासह थेट सरपंच पदाच्या ) सार्वत्रिक निवडणूकांसाठी संगणक प्रणालीव्दारे तसेच ग्रामपंचायतीतील रिक्त जागांच्या पोट निवडणुकांसाठी पैठण तालुक्यातील पाच ग्रामपंचायत अनुक्रमे वडवाळी, (सार्वत्रिक निवडणूक) पारूंडी, आडुळ बु, पाचोड बु,नायगाव. (पोट निवडणूक). तहसीलदार यांनी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करण्याचा दिनांक ६ऑक्टोबर नामनिर्देशनपत्रे मागविण्याचा व सादर करण्याचा दिनांक १६,ते२० ऑक्टोबर,
नामनिर्देशनपत्र छाननी करण्याचा दिनांक २३, नामनिर्देशनपत्र मागे घेण्याचा अंतिम दिनांक २५, निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दि. २५, आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक ५ नोव्हेंबर मतमोजणी व निकाल घोषित करण्याचा दिनांक ६ नोव्हेंबर. वडवाळी येथे बालाजीचा मोठा लळीतोत्सव आसतो नेमकी ग्रामपंचायत निवडणूक ही याच काळात आली,यापुर्वी सन २०१८ ला ग्रामपंचायत निवडणूक व बालाजी यात्रा एकाच सप्ताह काळात आली असल्याने ग्रामस्थानी एकमुखी निर्णय घेतला व निवडणूक पुढे ढकलली होती.यदाही ग्रामपंचायत निवडणूक व बालाजी यात्रा एकाच सप्ताहात आली आहे.

# कन्नड येथे मूल्यसंस्कार आढावा बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथे परमपूज्य गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे यांच्या पावन सान्निध्यात मुल्यसंस्कार मेळावा व मातृ-पितृ पाद्य पूजन सोहळ्याचे आयोजन दिनांक २६ व २७ नोव्हेंबर २०२३ रोजी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील बजाजनगर येथे करण्यात आले आहे. या अनुषंगाने आदरणीय नितीन मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा व नियोजन बैठक कन्नड येथे घेण्यात आली व याप्रसंगी आदरणीय नितीन मोरे यांचे मार्गदर्शन व हितगुजाचा उपस्थित भाविकांनी लाभ घेतला. मुल्यसंस्कार ही काळाची गरज असून परमपूज्य गुरुमाऊली आण्णासाहेब मोरे यांच्या वृद्धाश्रम मुक्त भारत चळवळीचा अविभाज्य व महत्त्वपूर्ण घटक आहे असे प्रतिपादन नितीन मोरे यांनी हितगुजातून उपस्थितांना केले. तसेच गर्भ संस्कार, शिशुसंस्कार बालसंस्कार, युवा प्रबोधन व युवती प्रबोधन वर्गाचे महत्व पटवून देत गाव तेथे बालसंस्कार वर्ग, वाडी-वस्ती तेथे बालसंस्कार वर्ग, केंद्र तेथे बालसंस्कार वर्ग, शाळा तेथे बालसंस्कार वर्ग व घर तेथे बालसंस्कार विद्यार्थी ही बदलत्या काळाची गरज आहे असे सांगून पर्यावरण प्रकृती, वृक्ष लागवड व संवर्धन यांचे महत्व पटवून दिले.



# शाळेला प्रिंटर-झेरॉक्स मशीन भेट देऊन श्रीकांत पवार यांचा वाढदिवस साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** आतिषबाजी -केक यावरील खर्च टाळून जिजामाता शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष श्रीकांत पाटील पवार यांनी शिवछत्रपती विद्यालयासाठी प्रिंटर व झेरॉक्स मशीन देऊन त्यांनी आपला वाढदिवस विद्यार्थ्यांत साजरा केला.शिक्षण विस्तार अधिकारी टेकाळे, विद्यालयाचे मुख्याध्यापक दामोधर वडजे, केंद्र प्रमुख बाबुराव फसमले, शिक्षक नेते हरिभाऊ चव्हाण प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक हणमंत पवार यांनी श्रीकांत पवार यांना सत्कार केला व अभिष्टचिंतन केले.

शिवछत्रपती प्राथमिक व माध्यमिक विद्यालय लोहा या शाळेत संस्थेचे कोषाध्यक्ष श्रीकांत वसंतराव पवार यांनी बॅनर -आतिषबाजी यावर खर्च न करता विधायक व उपयुक्त असलेले कार्य करून त्यांक आपला वाढदिवस साजरा केला. विद्यालयास त्यांनी प्रिंटर कम झेरॉक्स मशीन दिली यावेळी शाळेच्या वतीने त्याचा मुख्याध्यापक दामोधर वडजे, हणमंत पवार यांनी सत्कार केला.व दोघांनी त्यांना शुभेच्छा दिल्या व त्याच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला. तसेच विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला प्रसिद्ध निवेदक बालाजी गवाले यांनी खास शैलीत शुभेच्छा दिल्या. सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. डॉ. याकूबखान उर्दु प्राथमिक शाळा येथे शिक्षण विस्तार अधिकारी सर्जेराव टेकाळे, केंद्रप्रमुख बाबुराव फसमले, शिक्षक नेते हरिभाऊ चव्हाण यांच्या उपस्थितीत श्रीकांत पाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला मुख्याध्यापक शेख सुल्तानखान यासह शिक्षक वृंद उपस्थित होते या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.



# प्रसिद्ध ढोलकीवादक कृष्णा मुसळे, हार्मोनियमवादक अजय जोगळेकर यांचा मुंबईत सन्मान





आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गीतांना साज चढवणा-या सहवादकांचा सन्मान करण्यासाठी 'स्वरबंध' संस्थेतर्फे 2008 सालापासून सहवादक पुरस्कार सोहळा आयोजित केला जातो. यावर्षी 24 आणि 25 वा पुरस्कार सोहळा आज (5 ऑक्टोबर) सायंकाळी 7.30 वाजता दादर मुंबईतील स्वा. सावरकर सभागृहात होणार आहे. यंदाच्या पुरस्काराचे मानकरी महाराष्ट्राचे प्रसिद्ध ढोलकीवादक आणि मराठवाड्याचे भूमिपुत्र कृष्णा मुसळे आणि प्रसिद्ध हार्मोनियमवादक अजय जोगळेकर हे राहणार आहेत.

महाराष्ट्राचे प्रसिद्ध ढोलकीवादक आणि मराठवाड्याचे भूमिपुत्र कृष्णा मुसळे यांनी आपल्या जादुई बोटांनी ढोलकीची मनोभावे सेवा केली. त्यांच्या ढोलकीवादनाने रसिकांची वाहवा मिळवली. आज ते महाराष्ट्रातील लोकप्रिय कार्यक्रमातून ख्यातकीर्त ढोलकीवादक म्हणून नावारूपास आले आहेत. तसेच प्रसिद्ध हार्मोनियमवादक अजय जोगळेकर यांनीदेखील हार्मोनियम वादनातून आपली वेगळी छाप मांडून रसिकांना मोहीत केले आहे. या दोघांच्याही अद्वितीय कलेचा गौरव स्वरबंधतर्फे आज मुंबईत विशेष सन्मान देऊन करण्यात येत आहे. त्याबद्दल या दोन्ही प्रसिद्ध कलावंतांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# लोकस्वराज्य आंदोलन हदगाव तालुकाध्यक्षपदी दयानंद गायकवाड

आधुनिक केसरी न्यूज



**हदगाव :** अनेक वर्षापासून लोकस्वराज्य आंदोलन या आक्रमक व ईमानदार अशी ओळख असलेली सामाजिक संघटनेत अतिशय निष्ठेने इमानदारीने, कष्टाने स्वतःच्या बळावर आणि संघटनेच्या ध्येय धोरणानुसार एका निष्ठेने ऊन,वारा,पाऊस याची तमा न बाळगता, एका गरीब कुटुंबातील सच्चा कार्यकर्ता म्हणून रस्त्यावर उतरून प्रस्थापित हदगाव तालुका असो की, नांदेड जिल्हातील ईतर राजकारणी,अन्याय करणार्यां विरोधात आणि समाजावर होणाऱ्या अन्याय,अत्याचार विरोधात लढणारा तसेच संयमी,तरुण म्हणून संपूर्ण हदगाव तालुक्याला नव्हे तर नांदेड जिल्ह्यात ओळख असलेला युवक म्हणून त्यांची नोंदआंदोलनाकडे असलेला,मा.श्री दयानंद गायकवाड कोळीकर यांची सर्वानुमती,बिनविरोध हदगाव तालुका अध्यक्षपदी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या हस्ते एका बैठकीतुन दिनांक २७ सप्टेंबर२०२३ रोजी नांदेड येथील राजयोग लॉजिंग बोर्डिंग हॉटेल्स नमस्कार चौक नांदेड येथे सर्वांच्या साक्षीने बिनविरोध निवड करण्यात आलीआहे.लोकस्वराज्य आंदोलनाचे संस्थापक/अध्यक्ष प्राध्यापक रामचंद्रजी भरांडे सर नांदेड यांना अभिप्रेतअसणारी आणि महामानवाच्यां विचारावर सतत संघर्ष करुन चालणारे संघटन बांधण्यासाठी व या बांधणीतून संघटनेला बळकटी देण्यासाठी तालुक्यात व शहरात संघटन आणखी मजबूत करण्यासाठी संघटनेचे ध्येय धोरणे ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्य समाजातील समाज बांधव, महिला, पुरुष, युवक, युवतीपर्यंत पोचण्याकरिता या पदाची निवड केली असल्याचे, यावेळी वरिष्ठांनी आपल्या मनोगतातुन भावना व्यक्त केल्याआहेत. या बैठकीला महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा जेष्ठ नेते व्हि.जी. डोईवाड धर्माबाद, कामगार आघाडीचे प्रदेशाध्यक्ष तथा मार्गदर्शक रावसाहेबदादा पवार नायगाव बा., नागोराव नामेवार सर, गणपत रेड्डी, एकनाथ रेडे, संभाजीराजे वाघमारे, बी.एम. गोणारकर, यादवराव सुर्यवंशी सर, शेषेराव रोडे, संजय खानजोडे हदगाव, अर्जुन गायकवाड, धोंडोपंत बनसोडे नांदेड जिल्हाध्यक्ष उत्तर विभाग नांदेड, कैलास सूर्यवंशी नांदेड जिल्हाध्यक्ष दक्षिण विभाग जिल्हा नांदेड, सुनील जाधव महानगराध्यक्ष, हिमायतनगर तालुकाध्यक्ष सदानंद ऐरणकर पार्डीकर यांच्या उपस्थितीत निवड झाली आहे. उर्वरित तालुका कार्यकारणीच्या पदाधिकार्रानांआणि विविध आघाड्यातील पदाधिकाऱ्यांना येणाऱ्या काळात हदगाव येथे तालुकास्तरीय बैठक घेऊन पुढील नियुक्त्या करून लगेच निवडीचे नियुक्तीपत्र प्रधान करण्यात यावे, असे सांगितले आहे. आता पुढील काळात अनेक तरुणांना विविध आघाड्यांवर नियुक्ता करण्यात येणार आहेत. या बैठकीला तालुक्यातील अनेक तरुणांची आवर्जून उपस्थिती होती. तालुका कार्यकारणी मध्ये निवड झालेल्या नुतन तालुकाध्यक्ष सह, ईतर पदाधिकाऱ्यांना तालुक्यातील व जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांनी, मित्र परिवाराकडुन, संघटनेच्या कार्यकर्त्यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना भावी पुढील कार्यास हार्दिक शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन केले आहे.

# वारकरी शिक्षण संस्थानमध्ये ज्ञानेश्वरी जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी शिक्षण संस्थानमध्ये आज सकाळी ६ ते ९वाजेपर्यत संस्थानमधील सर्व विद्यार्थ्यांनी सामुहिक ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे पोथीचे पारायण करण्यात आले. सकाळी ९ वा. ज्ञानेश्वर महाराज यांच्या मुर्तीला अभिषेक करुण ग्रंथराज ज्ञानेश्वरी पोथीचे पूजन ओमप्रकाश लोखंडे, युवा कीर्तनकार ह.भ.प. सचिन महाराज लंबे वारकरी शिक्षण संस्था याच्या हस्ते पुजन व महाआरती नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पत्रकार एकनाथ आवचार, रामभाऊ मगर, रामदास पालवे, दत्ता ऊगले, गोरख महाराज जाधव, पांडुरंग महाराज मिराशे, योगेश महाराज वारे, सोपान वारे, दीपक मस्के, ओमकार बोडारे, वैभव काचगुंडे, खताळ, कृष्णा गायकवाड, गोपीनाथ आवचार, कृष्णा कोचार, आकाश कोचार, वारे, अजय गाडेकर यांच्यासह येथील वारकरी शिक्षण संस्थानमधील सर्व विद्यार्थ्यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.



